वर्षा प्रकाशन दुसरें

क्रा० वि० ४३५९

BVBK-0404359

# काव्य-ज्योति

वि. स. खांडेकर

किंमत सव्वा रुपया

वर्षा प्रकाशन दुसरें

२९९६२
का.वा.
२१००
३-०-६१

म. ३. की. लाये.
दा. क्र. ७३५८
वि. का.वा.

# काव्य-ज्योति

वि ... र

वि ... पया

BVBK-0404359

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार पेठ, पुणें २

● ● ●

पहिली आवृत्ति १९३९
दुसरी आवृत्ति १९४७
तिसरी आवृत्ति १९५२

● ● ●

सर्व हक्क सुरक्षित

● ● ●

मुखपृष्ठावरील चित्र
श्री. डी. डी. दलाल
यांचें आहे.

● ● ●

मुद्रक
गंगाधर शंकर दाते
कलागृह छापखाना
६६६ सदाशिव पेठ, पुणें २

● ● ●

देशमुख कंपनी

## दोन शब्द

'काव्य-ज्योति' या छोट्या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ति १९३९ सालीं निघाली. अनेक शाळांनीं मोठ्या प्रेमानें या पुस्तकाचें स्वागत केल्यामुळें ती लवकरच संपून गेली. कांहीं आवश्यक सुधारणा करून दुसरी आवृत्ति त्वरित प्रकाशित करायचा आमचा विचार १९४२ पासून चालला होता. पण गेल्या पांच वर्षांत मोठमोठ्या राष्ट्रांप्रमाणें तुमच्या आमच्यासारख्या छोट्या माणसांनाहि मनांतल्या मनांत युद्धोत्तर योजना आंखण्यापलीकडे दुसरें कांहींच करतां आलें नाहीं.

या काळांत एक लोंकरी कोट करायचा असला तरी सामान्य संसारी मनुष्य मनांत म्हणत असे, 'पंचवीस रुपये वार कापड घेऊन आणि शिंप्याला तीस चाळीस रुपये दक्षिणा देऊन आजच कोट शिवायची इतकी काय जरूरी आहे? ही लढाई जन्मभर थोडीच चालणार आहे! ती संपली म्हणजे स्वस्ताई होईल. आणि मग आपण थोड्या पैशांत असा सुंदर कोट शिवून टाकूं कीं रस्त्यानें जाणारे येणारे लोक आपल्याकडे टकमक पाहातच राहतील.'

पण बिचाऱ्याला शेखमहंमदानें सुद्धां हंसावें अशी त्याच्या या मनोराज्याची स्थिति झाली. युद्ध संपल्याचें वर्तमानपत्रांवरून त्याला कळलें. पण बाजारांत पाऊल टाकलें रे टाकलें कीं, वर्तमानपत्रांतल्या इतर अनेक बातम्यांप्रमाणें हीहि बातमी खोटी असली पाहिजे, असें राहून राहून त्याच्या मनांत येऊं लागलें. युद्धकाळापेक्षांहि युद्धोत्तर काळांत महागाई वाढली. त्यानें नवा लोंकरी कोट करावा अशी जिना, चार्चिल, ट्रुमन, स्टॅलिन वगैरे बड्या लोकांची कांहीं इच्छा दिसेना! अजूनहि थंडीच्या दिवसांत कुडकुडत लोंकरी कोट करण्याचा बेत बापडा करीत बसला आहे!

'काव्य-ज्योती'चें थोडेंसें असेंच झालें. विद्यार्थिवर्गांत प्रिय झालेलें हें पुस्तक पूर्ववत् स्वस्त द्यावें, म्हणून प्रकाशक वाट पाहात राहिले. पण शिमगा गेला तरी कवित्व मागें रहातें ना! युद्ध संपलें तरी त्याची सख्खी बहीण महागाई अजून तशीच रेंगाळत राहिली आहे. या आक्काबाईला सारें जग पादाक्रांत

करण्याच्या राक्षसी वेडानें पछाडलेलें दिसतें. अशा स्थितींत अधिक वाट पाहण्यांत अर्थ नाहीं, म्हणून ही आवृत्ति प्रकाशक रसिकांना सादर करीत आहेत.

● ● ●

हा संग्रह अनेक हेतु मनांत धरून तयार केला आहे. ज्याला आपण आधुनिक म्हणतों त्या काव्याचा प्रसार पंचवीस वर्षांपूर्वी फारसा झाला नव्हता हें खरें. पण त्या काळीं समाजाला जें काव्य परिचित आणि प्रिय होतें त्याचें पाठांतर आबालवृद्धांच्या हातून कळत नकळत होत असे. लहानपणीं मोरोपंतांच्या अनेक सुंदर आर्यांशीं माझा स्वतःचा परिचय झाला तो कीर्तनांच्या द्वारें. तुकोबांच्या अभंगांतली आर्तता मला प्रथम जाणवली तीहि भजनें ऐकून. अशा रीतीनें बालपणींच परिचित होणारें काव्य जन्मभर जिभेवर खेळत आणि मनांत घुमत राहतें. सूक्ष्म, सुंदर सुगंधाप्रमाणें आपल्या हृदयांत तें सदैव तरंगत असतें. एखाद्या पूज्य किंवा प्रिय व्यक्तीच्या सहवासांत मनुष्याच्या मनाला जी शांति प्राप्त होते ती अशा कवितांच्या सहवासांतहि लाभते. म्हणूनच सुंदर, सरस व साज्वळ कवितेचें पाठांतर हा जीवनांतला एक अमूल्य ठेवा आहे असें अनेकांना वाटतें.

पण गेल्या दोन तपांत आपल्यांतली कवितेच्या पाठांतराची प्रथा झपाट्यानें मागें पडूं लागली आहे. भेंड्या लावून तासतास खेळणारीं मुलें आतां कुठेंच दिसत नाहींत ! भेंड्यांची जागा आतां कॅरमनें घेतली आहे. मोरोपंतांच्या आर्या ज्यांनीं भडाभड पाठ म्हणाव्यात अशा विद्यार्थ्यांच्या तोंडीं आजकाल नाचरें चित्रपट संगीत ऐकूं येत आहे. तुकोबांचे पंचवीस चांगले अभंग कोणते म्हणून चवदा पंधरा वर्षांच्या मुलामुलींना विचारलें तर शंभरांपैकीं एखाद्याला तरी ती यादी तयार करतां येईल कीं नाहीं याची शंकाच आहे !

काळ बदलला, कीर्तनें आणि भजनें मागें पडलीं, आपल्या भाव-भावना आणि आशा आकांक्षा निराळ्या झाल्या. त्यामुळें पूर्वीप्रमाणें प्राचीन कवितेशीं नव्या पिढीचा निकट संबंध राहिला नाहीं, असें एक वेळ म्हणतां येईल. आधुनिक कवितेसंबंधानें तशी सबब सुद्धां पुढें करतां येणार नाहीं. पण आजच्या

विद्यार्थ्यांना केशवसुतांपासून कुसुमाग्रजांपर्यंतच्या अनेक कवींच्या कितीशा तेजस्वी कविता पाठ येतात ?

पाठांतराच्या दृष्टीनें इष्ट अशा आधुनिक कवितांचा छोटा पण सुंदर संग्रह तयार करणें हा ‘ काव्य-ज्योती ’च्या रचनेंतला एक हेतु आहे. त्याचप्रमाणें या संग्रहांत गेयता व विविधता यांच्या जोडीनें तेजस्विता व उदात्तता असावी याबद्दल दक्षता घेतली आहे. हा संग्रह प्रथम प्रसिद्ध झाला तेव्हां देशाचें स्वातंत्र्य किती दूर आहे याची कुणालाच कल्पना करतां येत नव्हती. त्यामुळें पारतंत्र्याचा तिरस्कार व स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या, त्यागाचें स्फुलिंग फुलविणाऱ्या आणि दिव्यत्वाची पूजा शिकविणाऱ्या कवितांना ‘ काव्यज्योती ’त मानाचें स्थान मिळालें आहे. आतां स्वातंत्र्य दृष्टिपथांत आलें आहे ही गोष्ट खरी. पण तेवढ्या-मुळें या कवितांची प्रेरकता थोडीच कमी होणार आहे ! आपलें राजकीय पार-तंत्र्य लवकरच नाहींसें होण्याचा संभव असला तरी भारतांत मानवतेचें मंदिर घडविण्याचें काम यापुढें पिढ्यान् पिढ्या आपल्याला चालवावयाचें आहे. आज त्या मंदिराचें स्पष्ट चित्र सुद्धां आपल्या डोळ्यांपुढें उभें नाहीं. पण त्याचें जें कांहीं अस्पष्ट दर्शन आपल्याला झालें आहे त्यावरून आपण सर्वांनीं घाम, अश्रु आणि रक्त दिल्याशिवाय हें मंदिर बांधून होणार नाहीं हें उघड आहे. या भूमींत प्राचीन काळीं उभें असलेलें त्या प्रकारचें मंदिर कधींच ढांसळून पडलें आहे. त्याच्या उध्वस्त भिंतींतले दगड इकडे तिकडे अवास्तव पडले आहेत. ते दगड गोळा करून पुन्हां चटकन् हें मंदिर आपण उभारूं शकूं अशी अनेकांची कल्पना आहे, पण ती सर्वस्वीं निराधार आहे. ‘ नवा शिपाई ’ किंवा ‘ तेथें कर माझे जुळती ’ अशा कवितांतून सूचित होणाऱ्या मार्गानें प्रवास करूनच या मंदिराकडे आपण जाऊं शकूं.

माणसांच्या अंतरंगांत सुप्त रीतीनें वास असलेल्या उदात्ततेला अनेक रीतींनीं आवाहन करतां येतें. वीररसाइतकाच करुणरसहि त्या कामीं उपयोगीं पडतो. ‘ तुरुंगाच्या दारांत ’ आणि ‘ गर्जा जयजयकार ’ या कवितांच्या जोडीनें ‘ एक प्रसंग ’ व ‘ कृतज्ञता ’ या कविता वाचल्या म्हणजे हें सहज लक्षांत येईल. ‘ भेटेन नऊ महिन्यांनीं ’, ‘ वहिनीस पत्र ’ वगैरे मानवी मनाचें सामर्थ्य व्यक्त करणाऱ्या कवितांप्रमाणें ‘ साद ’, ‘ सहगमन ’ वगैरे त्याच्या दुर्बलतेचें चित्रण

करणाऱ्या कविता हि आपल्याला उदात्त वातावरणांत नेऊन सोडतात याचें कारण हेंच आहे.

या संग्रहांतल्या कवितांची निवड करतांना प्रत्येक कवितेंत प्रेरकता असावी, मनाच्या कारागृहांत कोंडून पडलेल्या उदात्ततेला तिची हांक पोंचावी अशी काळजी घेतली आहे. 'काव्यज्योती'तली प्रत्येक कविता अनेक साहित्यगुणांनीं नटलेली व उच्च भावनांनीं भरलेली अशीच आहे. ती आपल्या नादमाधुर्यानें, कल्पनाविलासानें आणि अशाच प्रकारच्या प्रतिभागुणांनीं वाचकाचें रंजन तर करीलच, पण त्याचबरोबर त्याच्या विविध, कोमल आणि उदात्त भावना जागृत करून ती त्याला उच्च वातावरणांत नेईल. ती त्याच्या मनांत वाङ्मयाविषयीं अभिरुचि, जीवनविषयीं प्रीति आणि मानवतेविषयीं भक्ति निर्माण करून त्याच्या बुद्धीवर चिरंतन संस्कार करील.

● ● ●

पहिल्या आवृत्तींत मराठी विभागाबरोबर हिंदी विभाग म्हणून तीन हिंदी कवितांचा या संग्रहांत समावेश करण्यांत आला होता. दहा वर्षांपूर्वी हिंदीची गोडी महाराष्ट्राला नुक्ती कुठें लागूं लागली होती. त्यामुळें जेवायला गेलेल्या सुवासिनीनें बरोबर आपलें लहान मूल घेऊन जावें, त्याप्रमाणें या इनमीन तीन हिंदी कविता मराठी कविता-संग्रहांत शोभून गेल्या. पण गेल्या दशकानें केवळ राजकारणांतच नव्हे तर इतर गोष्टींतहि अनपेक्षित बदल घडवून आणले आहेत. केवळ शाळेच्या चिमण्या जगांतच नव्हे, तर शाळेबाहेरच्या विशाल व्यवहारांतहि हिंदीला मानाचें स्थान मिळूं लागलें आहे. तिचा अभ्यास मोठ्या हौसेनें केला जात आहे. दहा वर्षांपूर्वी हिंदीच्या पुसट परिचयामुळें न्यू थिएटर्सचे चांगले चित्रपट जिथें दोन तीन आठवडे चालूं शकत नसत, तिथें सर्वसामान्य हिंदी चित्रपट आज आठदहा आठवडे ठाण मांडून बसूं लागला आहे. हें सर्व लक्षांत घेतां राष्ट्रीय भावनांनीं रसरसलेल्या हिंदी कवितांचा स्वतंत्र संग्रहच होणें इष्ट आहे असें वाटून या आवृत्तींतून पूर्वीच्या हिंदी कविता गाळण्यांत आल्या आहेत.

पहिल्या आवृत्तींतली एक कविता या आवृत्तींत गाळली असून दुसरी एक बदलली आहे शिवाय केशवसुत, केशवकुमार, कुसुमाग्रज प्रभृति कवींच्या पांच

नवीन कवितांचा समावेश या आवृत्तींत करण्यांत आला आहे. या कविता निवडतांना अनेक रसपूर्ण स्फूर्तिदायक कवनें माझ्या डोळ्यांपुढें उभीं होतीं. उदाहरणार्थ, केशवसुतांची ' नवा शिपाई ' ही मानवधर्माचा पुरस्कार करणारी कविता मी या संग्रहांत घेतली असली तरी अन्यायाचा प्रतिकार करण्याची शिकवण देणारी त्यांची ' गोफण ' मला तिच्याहून कमी आवडते, असें मात्र नाहीं. ' क्रान्तीचा जयजयकार ' ही कुसुमाग्रजांची कविता विशेष लोकप्रिय झालेली असली तरी तिच्या तोडीचीं अनेक कवनें त्यांच्या तेजस्वी प्रतिभेंतून निर्माण झालीं आहेत. अशावेळीं निवड करणाराची मनःस्थिति सुंदर वस्तूंनीं भरलेल्या दुकानासमोर चार आणे हातांत घेऊन उभ्या राहिलेल्या बालकासारखी होते. त्या बाळजीवाला दुकनांतल्या अनेक चांगल्या चांगल्या वस्तू विकत घ्याव्याशा वाटतात. पण दुकानदार त्याच्या आशाळभूत डोळ्यांकडे कधींच पाहात नाहीं. त्याचें लक्ष त्या बालकाच्या हातांतल्या पैशाकडे असतें.

अत्यंत मर्यादित जागेंत या संग्रहाचा प्रपंच मांडावयाचा असल्यामुळें माझ्या आवडीचे कांहीं कवी व अनेक कविता यांचें या संग्रहात मी स्वागत करूं शकलों नाहीं. किंमतींत वाढ न करितां पृष्ठसंख्येंत वाढ करण्याचा सुयोग पुढल्या आवृत्तीपर्यंत आला तर त्यावेळीं हें वैगुण्य मी अगत्य दूर करीन

● ● ●

आपल्या बहुतेक शाळांतून स्थूल वाचनाकडे अद्यापि दुर्लक्ष होत असलेलें दिसतें. पण विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम मनाच्या विकासाच्या दृष्टीनें काव्यज्योती-सारखीं पुस्तकें त्यांनीं स्वच्छंद वृत्तीनें वाचणें अत्यंत आवश्यक आहे, असें मला वाटतें. हें मी धंदेवाईक दृष्टीनें—या पुस्तकाशीं संबंध असलेला लेखक म्हणून—बोलत नाहीं. शिक्षक आणि पालक या दोन्ही नात्यांनीं मला नेहमीं असें वाटत आलें आहे कीं, दहा ते पंधरा वर्षांच्या मुलांमुलींच्या मनावर कोमल कल्पनांचे आणि उदात्त भावनांचे जेवढे संस्कार करतां येतील, तेवढे समाजानें आवर्जून केले पाहिजेत. जीवनधर्माची जाणीव अंतःकरणांत लहानपणीं न मुरल्यामुळें आजचें जग शांतिसुखाला पारखें झालें आहे. ती दुर्लभ शांति सामान्य माणसांच्या अंतःकरणांतली मानवतेची भक्ति पाहूनच पुन्हां या जगांत अवतार घेईल. अशी भक्ति लहान मुलांच्या मनांत निर्माण करण्याचीं साधनें दोनच आहेत—

उत्कृष्ट आणि उदात्त काव्य व रामायण, महाभारत, बायबल यांच्या-सारखे ग्रंथ.

माझें हें मत ज्यांना मान्य होणार नाहीं, त्यांनीं शांत एकान्तांत या संग्रहांतल्या खालील ओळी स्वतःशीं गुणगुणून पाहाव्यात, अशी मी त्यांना विनंति करतों—

● ● ●

‘ यज्ञीं ज्यांना देउनि निज शिर
घडलें मानवतेचें मंदिर
परी जयांच्या दहनभूमिवर
नाहिं चिरा नाहीं पणती
तेथें कर माझे जुळती ’
‘ ब्राह्मण नाहीं हिंदुहि नाहीं न मी एक पंथाचा
तेच पतित कीं जे आंखडिति प्रदेश साकल्याचा ’
‘ पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथीं
ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालतीं
मुकुट रंकास दे, करटि भूपाप्रति
झाड खट्‌खट् तुझें खड्‌ग क्षुद्रां !
डुम्‌डुमत डमरु ये, खण्‌खणत शूल ये
शंख फुंकीत ये येइ रुद्रा. ’

या संग्रहांतल्या प्रत्येक कवितेंत असें कांहीं तरी—अंतःकरणाला विशाल करणारें, मनावरली काजळी झाडून टाकणारें आणि आत्म्याच्या सुप्त सामर्थ्याला आवाहन देणारें भरलें आहे असें वाचकांना आढळून येईल. अंधारांत तारका पाहून मनाला धीर येतो ना ? जीवनमार्गावरल्या प्रवाशाला काव्य-ज्योतींतल्या अनेक कविता तशाच वाटतील.

कोल्हापूर
१२-५-४७

वि. स. खांडेकर

● ● ●

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र भूपाळी<br>दत्तो अप्पाजी तुळजापूरकर | ११ |
| २. | तेथें कर माझे जुळती<br>बा. भ. बोरकर | १४ |
| ३. | तुरुंगाच्या दारांत<br>यशवंत | १७ |
| ४. | केवढें हें क्रौर्य !<br>ना. वा. टिळक | २० |
| ५. | भेटेन नऊ महिन्यांनीं<br>कवि कुंजविहारी | २३ |
| ६. | आई<br>यशवंत | ३१ |
| ७. | देशाचा संसार<br>सेनापति बापट | ३५ |
| ८. | वहिनीस पत्र<br>वि. दा. सावरकर | ३९ |
| ९ | अश्रु<br>साने गुरुजी | ४३ |
| १०. | सागरास<br>वि. दा. सावरकर | ४५ |
| ११. | माझें मृत्युपत्र<br>वि. दा. सावरकर | ४८ |
| १२. | एक प्रसंग<br>ग. त्र्यं. माडखोलकर | ५४ |
| १३. | माझ्या जन्मभूमीचें नांव<br>ना. वा. टिळक | ५८ |
| १४. | घे कुठार<br>वा. गो. मायदेव | ६० |

| | | |
|---|---|---|
| १५. | महाराष्ट्र-गीत<br>श्री. कृ. कोल्हटकर | ६२ |
| १६. | सुंदर मी होणार !<br>कवि गोविंद | ६४ |
| १७. | कृतज्ञता<br>गिरीश | ६८ |
| १८. | तानाजीच्या पत्नीचा विलाप<br>कवि गोविंद | ७१ |
| १९. | आमुची मायबोली<br>मा. त्र्यं. पटवर्धन | ७५ |
| २०. | सहगमन<br>वि. स. खांडेकर | ७८ |
| २१. | प्रेम आणि मरण<br>गोविंदाग्रज | ८१ |
| २२. | रुद्रास आवाहन<br>भा. रा. तांबे | ८८ |
| २३. | द्या आम्हाला सुळीं<br>यशवंत | ९२ |
| २४. | फत्तर आणि फुलें<br>केशवकुमार | ९५ |
| २५. | क्रान्तीचा जयजयकार<br>कुसुमाग्रज | ९७ |
| २६. | नवा शिपाई<br>केशवसुत | १०० |
| २७. | साद<br>बा. भ. बोरकर | १०३ |
| २८. | अभ्यास | १०५ |
| २९. | कविपरिचय | ११५ |

२९.१.६७
का. आ
२१४४
३-९-६१

## महाराष्ट्र-भूपाळी

### परिचय

जुन्या काळीं पहाटे उठल्याबरोबर प्रत्येकाला परमेश्वराचें नामस्मरण घडावें या हेतूनें भूपाळया रचल्या जात असत. ' घनश्याम सुंदरा ' ही अशा प्रकारची भाव-मधुर भूपाळी सर्वपरिचित आहेच. पण काळाबरोबर ईश्वराचें रूपहि बदलत जातें. देश हाच आपल्या आयुष्यांतला परमेश्वर या भावनेनें जीवनाकडे पाहण्याची दृष्टि आपल्या समाजांत आतां उत्पन्न झाली आहे

' महाराष्ट्र-भूपाळी ' ही कविता या नवीन दृष्टीचीच द्योतक आहे. पहिल्या कडव्यांत कवि महाराष्ट्राचें भौगोलिक माहात्म्य वर्णन करतो; दुसऱ्यांत 'विळा कोयतींच जयांचीं काय तीं हत्यारें ' असा ज्या मावळे-मराठ्यांचा विनायक कवीनें उल्लेख केला आहे, त्यांच्या वीरश्रीला तो वंदन करतो; तिसऱ्यांत ज्याचा कुठल्याहि राष्ट्राला अभिमान वाटावा त्या शिवछत्रपतींच्या पराक्रमापुढें तो भक्तिभावानें मस्तक नम्र करतो; चवथ्या कडव्यांत ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत विकास पावत आलेली मातृभाषा आणि ज्ञानेश्वरांपासून चोख्यामेळयापर्यंतचें सद्भावनांचा परिपोष करणारें सर्व जातींचें संतमंडळ, यांच्या पायांवर तो आपलें डोकें ठेवतो. शेवटच्या कडव्यांतील मुक्ताबाई, जनाबाई, अहल्याबाई, रमाबाई व लक्ष्मीबाई या विविध क्षेत्रांत पराक्रम गाजविणाऱ्या स्त्री-पंचायतनाचा उल्लेख कवीचें चातुर्य दर्शवितो.

गोविंदाग्रजांच्या महाराष्ट्र-गीताप्रमाणें यांत अर्वाचीन महाराष्ट्राच्या कर्तृत्वाचा उल्लेख नाहीं किंवा शब्दांची व कल्पनांची आकर्षक जडणघडणहि नाहीं. तथापि 'अलंकार जयाचे पैठण पंढरपूर', 'नच जात पाहतो भक्तांची ईश्वर ', 'गतवीरांचीं पुण्यें चरित्रें गाउनि अंगाई । बाळा करिते महाराष्ट्राची भगिनी वा आई ' असल्या ओळींमुळें या वर्णनात्मक कवितेंतहि मधून मधून भावरम्यतेची चमक निर्माण झाली आहे.

● ● ●

— १ —

प्रभावशाली परम मंगला महाराष्ट्र देशा ।।
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ।। ध्रु० ।।
सह्याद्रीच्या सहस्त्रशिखरीं उन्नत झालेला ।।
गोदा कृष्णा भीमा ह्यांनीं पुनीत केलेला ।।
पश्चिम सिंधु बंधु पाठिशीं पूर्वोदधि जामात ।।
विंध्याद्रीची उंची लक्षी सातपुडा प्रांत ।।
अलंकार जयाचे पैठण पंढरपुर ।
आळंदी चाफळ देहू तुळजापुर ।
कीं पुणें रायगड शिवनेरी सुंदर ।
रज:कणाला लावुनि भालीं महाराष्ट्र देशा ।।
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ।।

— २ —

वरी नाचणी भात पिकवितो कोंकणचा प्रांत ।।
गहूं बाजरी कापुस शाळू देशावर होत ।।
कांबळ खांदीं वहाण पायीं डोइस मुंडासें ।।
श्यामलवर्णी सान रूप तव सोज्ज्वळ मज भासे ।।
ते विळे कोयते शस्त्रें हीं हातिचीं ।
तीं बटें ठेंगणीं भीमेच्या कांठिचीं ।
मिळविती धुळीला कीर्ति बादशाहिची ।
वीरांना त्या वंदन अमुचें महाराष्ट्र देशा ।।
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ।।

— ३ —

वीर प्रतापी राय शिवाजी छत्रपती अमुचा ।।
धर्म रक्षण्या एकचि केला घोष स्वराज्याचा ।।
भगवा झेंडा धन्य करी हें आनंद-वन-भुवन ।।
स्वातंत्र्याच्या जरिपटक्याला लक्ष वेळ नमन ।।

पुण्याई पुरली शिवभूपाची पुढें ।
पेशवे पुण्याचे वळले अटकेकडे ।
साम्राज्य मराठी पसरे चोहोंकडे ।
स्मरणें स्फुरतें हृदय वांकतें महाराष्ट्र देशा ।।
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ।।

— ४ —

भीमा वाही तिच्या सुरावर गाई जी गीत ।।
तीच मराठी भाषा अमुची ठसली हृदयांत ।।
ज्ञानेशाची ओवी अभंग वाणी तुकयाची ।।
श्लोक वामनी जिला भूषवी आर्या मयुराची ।।
एकनाथ चोखा गोरा ज्ञानेश्वर ।
रामदास तुकया नामा मुक्तेश्वर ।
नच जात पाहतो भक्तांची ईश्वर ।
संतमंडळा लववूं माथा महाराष्ट्र देशा ।।
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ।।

— ५ —

मुक्ताबाई तशी जनाई आळविते देवा ।।
सद्भावाला सहज लाभतो मोक्षाचा ठेवा ।।
गतवीरांचीं पुण्य चरित्रें गाउनि अंगाई ।।
बाळा करिते महाराष्ट्राची भगिनी वा आई ।।
शोभवी अहल्या होळकरांची पुरी ।
ती सती रमा भट-वंशाला उद्धरी ।
स्वातंत्र्य-लक्ष्मी प्रचंड संगर करी ।
प्रणिपात असो ह्या देवींना महाराष्ट्र देशा ।।
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ।।

—दत्तो अप्पाजी तुळजापूरकर

# तेथें कर माझे जुळती

## परिचय

केशवसुतांनीं ' रांगोळी घालतांना पाहून ' ही कविता लिहून साध्या वाटणाऱ्या दृश्यांत किती अर्थ भरलेला असतो हें दाखविलें. साध्या दृश्याप्रमाणें साध्या माणसाकडेहि जगाचें सहसा लक्ष जात नाहीं. नित्याच्या परिचयामुळें, आणि बहिरंगावर भुलून जाणे हा मानवी स्वभावच असल्यामुळें, आपल्याभोंवतीं वावरणाऱ्या साध्यासुध्या माणसांमध्यें, जगांतल्या कोलाहलांत ज्यांचीं नांवें कधींच ऐकूं येत नाहींत अशा व्यक्तींच्या अंतरंगामध्यें किती उज्ज्वलता भरलेली आहे याची कुणालाहि कल्पना येत नाहीं. पर्वतावरून खळाळत येणाऱ्या जलप्रवाहाकडे प्रत्येकजण आदरानें पाहतो. पण धरणीमातेच्या पोटांतला अधिक उपयुक्त असा ओलावा मात्र कुणाचेंहि मन ओढून घेत नाहीं. जग अजून सामान्यांतलें असामान्यत्व ओळखण्याइतकें जाणतें झालें नाहीं हेंच खरें.

बोरकरांनीं या कवितेंत जगानें अत्यंत सामान्य मानलेल्या अशा महात्म्यांची पूजा केली आहे. वर्षानुवर्षें संसारांतलीं लहानमोठीं दुःखें हसतमुखानें सोसून घराला बागेचें रम्य रूप देणाऱ्या स्त्रीपुरुषांना काय सामान्यच म्हणायचें ? ज्यांच्या कष्टावांचून जग क्षणभरहि चालूं शकणार नाहीं ते स्वयंसेवक, शेतकरी, मजूर, भंगी यांच्या त्यागाला काय कांहींच किंमत नाहीं ? छेः ! कवि म्हणतो ' ज्यांनीं जीवन हा पवित्र यज्ञ मानला, जगाचें मंदिर उभें राहावें म्हणून त्याच्या पायांत आपल्या वैयक्तिक सुखाचा बळी दिला, त्यांचे पुतळे न होवोत ! माझ्या मनोमंदिरांत मी त्यांच्याच मूर्तीची पूजा करीत राहीन. '

जगासाठीं जगणाऱ्या, जग अधिक सुंदर व्हावें म्हणून झटणाऱ्या, मानवी हृदयांतल्या उदात्ततेला जागृत करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीपुढें, दृश्यापुढें, किंबहुना अनुभूतीपुढें कवीचें हळुवार मन विनम्र होत आहे.

शेवटच्या कडव्यांतल्या वर्णनाची भव्यता बोरकरांच्या कल्पकतेचें सामर्थ्य

दर्शविते. ' मध्यरात्रि नभ-घुमटाखालीं । शांतिशिरीं तम चंवऱ्या ढाळी ' या ओळी वाचल्या कीं वाटतें—आपण चित्रकार असतों तर बरें झालें असतें ! या दृश्याचें किती मनोहर चित्र आपण काढलें असतें !

● ● ●

[ **जाति :** प्रणयप्रभा; मिश्र पहाडी—**त्रिताल** ]

तेथें कर माझे जुळती
दिव्यत्वाची जेथ प्रतीती ।। ध्रु० ।।

हृन्मंदिरिं संसृतिशरस्वागत
हंसतचि करिती कुटुंबहितरत
गृहस्थ जे हरि उरांत रिझवित
सदनीं फुलबागा रचिती । तेथें कर माझे जुळती

ज्या प्रबला निज भावबलानें
करिती सदनें हरिहरभुवनें
देव पतींना वाहुनि सु-मनें
पाजुनि केशव वाढविती । तेथें कर माझे जुळती

गाळुनिया भाळींचें मोतीं
हरी-कृपेचे मळे उगविती
जलदापरि येउनियां जाती
जग ज्यांची न करी गणती । तेथें कर माझे जुळती

शिरीं कुणाच्या कुवचनवृष्टी
वरिती कुणि अव्याहत लाठी
धरिती कुणि घाणीची पाटी
जे नरवर इतरांसाठीं । तेथें कर माझे जुळती

यज्ञीं ज्यांनीं देउनि निजशिर
घडिलें मानवतेचें मंदिर
परी जयांच्या दहनभूमिवर
नाहि चिरा, नाहीं पणती । तेथें कर माझे जुळती

स्मितें जयांचीं चैतन्यफुलें
शब्द जयांचे नव दीप–कळे
कृतींत ज्यांच्या भविष्य उजळे
प्रेमविवेकीं जे खुलती । तेथें कर माझे जुळती

जेथ विपत्ती जाळी उजळी
निसर्गलीला निळी काजळी
कथुनि कायसें काळिज निखळी
एकाची सगळी वसती । तेथें कर माझे जुळती

मध्यरात्रि नभ–घुमटाखालीं
शांतिशिरीं तम चंवऱ्या ढाळी
त्यक्त बहिष्कृत मी ज्या काळीं
एकांतीं डोळे भरती । तेथें कर माझे जुळती

—बा. भ. बोरकर

# तुरुंगाच्या दारांत

## परिचय

मनुष्याला मृत्यूइतकीच जर दुसऱ्या कशाची भीति वाटत असेल तर ती तुरुंगाची. तुरुंग म्हणजे इहलोकांतली यमपुरीच! सुखाची कल्पनासुद्धां तुरुंगाच्या आसपास कधीं फिरकत नाहीं!

अशा ठिकाणीं आनंदानें जायला कुणी तयार होईल का?

व्यक्ति आणि कुटुंब यांच्या सुखापलीकडे ज्याला कांहीं दिसूं शकत नाहीं असा कुणीहि मनुष्य तुरुंगाच्या दारांत पाऊल टाकणार नाहीं. पण टिळक-गांधींच्यासारखे देशभक्त हंसतमुखानें तेथें जातात.

आणि यांत नवल असें काय आहे? गुलामगिरींत खितपत पडलेल्या देशांत तुरुंग हाच देशभक्ताचा बंगला असतो. हातापायांतल्या बेड्या हेच त्याचे अलंकार असतात! प्रसंगीं गळ्याभोंवतीं पडणारा फांस हाच त्याचा पुष्पहार होतो!

यशवन्तांनीं अशा तेजस्वी देशभक्ताच्या मनोवृत्तीचें सुंदर चित्रण या कवितेंत केलें आहे. *Stone-walls do not a prison make, nor iron bars a cage.* देशभक्ताचें शरीर अंधारकोठडींत कोंडलें तरी त्याचें मन कधींच बंदिवान होत नाहीं. जन्मतःच सूर्यबिंबाला ग्रासूं पाहणाऱ्या पराक्रमी हनुमंताचा आदर्श ज्यानें आपल्यापुढें ठेवला आहे, त्याच्या मनाला कोणत्या तुरुंगाच्या भिंती अडवूं शकतील? मातृभूमीच्या या भक्ताची देवीच्या गोंधळ्याशीं तुलना करण्यांत कवीच्या कल्पकतेची चमक दिसून येते. 'शृंखला पायांत माझ्या चालतांना रुमझुमे। घोष मंत्रांचा गमे।' या ओळींतली उदात्त निर्भयताहि अत्यंत आकर्षक आहे. 'और लढेंगे?' या शत्रूच्या प्रश्नाला 'बचेंगे तो और भी लढेंगे' हें उत्तर देणारा दत्ताजी शिंदे, धर्मशिळेवर उभी राहून हंसतमुखानें सती जाणारी साध्वी रमाबाई, आणि हें गीत गाणारा आधुनिक देशभक्त यांच्या मानसिक धैर्यांत रतिभरहि अंतर नाहीं. असलें मनोबळ हेंच परतंत्र राष्ट्राचें खडें सैन्य!

● ● ● •

[ वृत्त—पाण्डव दिडकी ]

वाढुं दे कारागृहाच्या भिन्तिची उंची किती
मन्मना नाहीं क्षिती

भिन्तिच्या उंचींत आत्मा राहतो का कोण्डुनी ?
मुक्त तो रात्रंदिनीं ?

भक्तिला जो पूर आला वाढतो तो अन्तरीं
पायरीनें पायरी;

फत्तरांच्या या तटांनीं ओसरावा काय तो ?
सारखा फोंफावतो

अंजनीच्या बालकानें सूर्यबिम्बा ग्रासिलें
मन्मनीं तें बिम्बलें

घालिती सैतानसे शत्रू इथें थैमान जें
तें गिळाया मी सजें

अग्निकुण्डीं पाय केव्हां, कण्टकींही केधवां
बन्दिखान्याची हवा

या विलासांमाजि होई आमुची जोपासना
तेज नाहीं याविना

हिन्ददेवी, गोन्धळी मी वाजवीतां सम्बळ
घालसी हातीं बळ
पेटलेला पोत हातीं स्वार्थ तैलें तेवतां
नाचवूनी नाचतां
या दऱ्यांखोऱ्यांतुनी स्वातंत्र्यगीतें गाउनी
दावितां मीं हिण्डुनी
आज आलों निर्भयें या मन्दिरीं विश्रान्तिला
मान्य झालें हें तुला
त्वत्कृपेचा सिंधु माझ्या मस्तकीं हेलावतां
काय दुक्खांची कथा
अग्निही वाटेल मातें चन्दनाचें लेपन
कीं सुधेचें सिंचन
शृंखला पायांत माझ्या चालतांना रुम्झुमे
घोष मन्त्रांचा गमे
लौकरी स्वातंत्र्यभानो ! भारतीं दे दर्शन
होउं तेव्हां पावन.

—कवि यशवन्त

# केवढें हें क्रौर्य !

## परिचय :

‘ कृतज्ञता ’ या कवितेंत एका बालकाच्या मृत्यूचें शब्दचित्र आहे. या कवितेंत एका पक्षिणीच्या अंतकाळाचें दृश्य रेखाटलें आहे. ही आई पिलांकरितां चारा आणायला गेली होती. कुठून तरी आलेल्या बाणानें ती घायाळ झाली. अंगांतून भळभळ रक्त वाहत असतांना पिलांना पाहावें, त्यांना शेवटचा घांस भरवावा, म्हणून धडपडत ती घरट्याकडे परत येते.

टिळकांनीं हा सर्व प्रसंग अत्यंत सहृदयतेनें वर्णन केला आहे. गरीब आणि सुंदर पांखराला केवळ गमतीनें मारणाऱ्या मनुष्याविषयीं स्वतःला आलेला राग वाचकाच्या मनांतहि उत्पन्न होईल ही दक्षता त्यांच्या कलेनें घेतली आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं आपला त्वेष कारुण्याशीं विसंगत न होईल अशा रीतीनें त्यांनीं व्यक्त केला आहे.

वाल्मिकीला क्रौञ्चवध पाहून काव्यस्फूर्ति झाली अशी आख्यायिका आहे. ‘ शोकः श्लोकत्वमागतः ’ असें ज्याचें वर्णन केलें जातें, त्या त्याच्या पहिल्या श्लोकांत क्रौञ्चपक्ष्यांच्या जोडप्यांपैकीं एकाला मारल्याबद्दल त्यानें निषादाला शाप दिला आहे.

काममोहित क्रौञ्चपक्ष्यापेक्षां घरट्यांत जिचीं लहान लहान पिलें आहेत अशा पक्षिणीचा वध कुणालाहिं अधिक करुणास्पद वाटेल. या कवितेंत वात्सल्याच्या भावनेचा पार्श्वभूमि म्हणून उपयोग करण्यांत टिळकांची कलात्म-कल्पकता प्रकट झाली आहे.

‘ मातींत ते पसरले अति रम्य पंख ! ’ हें वर्णन किती रेखीव आहे ! तें शब्दचित्र नसून चित्र आहे असेंच वाटतें.

● ● ●

क्षणोक्षणिं पडे, उठे परि बळें, उडे बापडी,
चुके पथहि येउनी स्तिमित दृष्टिला झांपडी;
किती घळघळां गळे रुधिर कोमलांगांतुनी,
तशीच निजकोटरा परत पातली पक्षिणी. ॥ १ ॥

म्हणे निजशिशूंप्रती ‘ अधिक बोलवेना मला,
तुम्हांस अजि अंतिचा कवळ एक मीं आणिला;
करा मधुर हा ! चला ! भरवितें तुम्हां एकदां
करो जतन यापुढें प्रभु पिता अनाथां सदा ! ॥ २ ॥

अहा ! मधुर गाउनी रमविलें सकाळीं जनां,
कृतघ्न मज मारितील नच ही मनीं कल्पना !
तुम्हांस्तव मुखीं सुखें धरुनि घांस झाडावरी
क्षणैक बसलें न तों, शिरत बाण माझ्या उरीं ! ॥ ३ ॥

निघून नरजातिला रमविण्यांत गेलें वय,
म्हणून वधिलें मला ! किति दया ! कसा हा नय !

उदार बहु शूर हा नर खरोखरी जाहला
वधून मज पांखरा निरपराध कीं दुर्बला ! ॥ ४ ॥

म्हणाल 'भुलली जगा, विसरली प्रियां लेंकरां,
म्हणून अतिसंकटें उडत पातलें मी घरां;
नसे लवहि उष्णता, नच कुशींत माझ्या शिरा,
स्मरा मज-बरोबरी परि दयाघना ईश्वरा' ॥ ५ ॥

असो; रुधिर वाहुनी नच भिजो सुशय्या तरी
म्हणूनि तरुच्या तळीं निजलि ती द्विजा भूवरी,
जिवंत बहु बोलकें किति सुरम्य तें उत्पल
नरें धरुनि नाशिलें, खचित थोर बुद्धि, बल. ॥ ६ ॥

मातींत ते पसरले अति रम्य पंख,
केलें वरी उदर पांडुर निष्कलंक !
चंचू तशीच उघडी, पद लांबवीले,
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले ! ॥ ७ ॥

—ना. वा. टिळक

# भेटेन नऊ महिन्यांनीं

## परिचय

देशाकरितां आनंदानें फांशीं जाणाऱ्या एका वीरयुवकाचे हे उद्गार 'कुंज-विहारी' नीं हृदयस्पर्शी पद्धतीनें चित्रित केले आहेत. हा तरुण मृत्यूला हसत हसत मिठी मारतो. आपल्यासारख्या व्यक्तींच्या मरणांतूनच राष्ट्राचा पुनर्जन्म होत असतो, अशी त्याची अढळ श्रद्धा आहे. सिंहगडावर पडलेल्या वीर तानाजीचा पोवाडा ज्या लेखणीनें गाइला, त्याच लेखणीतून एका अनामिक तरुणाचें हें शेवटचें गीत उतरलें आहे.

देशासाठीं बलिदान करणाऱ्या तरुणाला कोमल भावना नसतात असें कोण म्हणेल? पण वृद्ध आई, तरुण पत्नी आणि पाळण्यांतलें चिमणें बाळ या सर्वांच्या-कडे पाठ फिरवून तो आत्मदानाला तयार होतो! पारतंत्र्यांत खितपत पडलेला देश हें त्याला जळतें घर वाटतें घराला लागलेली ही आग विझविण्याकरितां तो स्वतःचें रक्त शिंपडतो. पारतंत्र्यांत जगणें म्हणजे उशाशीं साप घेऊन निजणें! या सापाला मारल्याशिवाय कुणाला झोप येईल? हा साप आपल्याला चावला, त्याच्या विषानें आपल्याला मृत्यू आला, तरी हरकत नाहीं; पण त्याला मारण्याचा प्रयत्न आपण केलाच पाहिजे, असा त्यानें मनाशीं निर्धार केलेला असतो.

फांशीच्या कल्पनेनेंसुद्धां सामान्य माणसें भिऊन जातात: पण हा निधड्या छातीचा तरुण त्या कल्पनेशीं विनोदानें खेळतो शिपायांच्या पहाऱ्यांत फांसाकडे जाणें ही जणूं कांहीं एखाद्या राजपुत्राची मिरवणूकच आहे असें त्याला वाटतें. आणि मिरवणूक संपल्यावर या राजपुत्राची स्वारी कुठें बसणार आहे? तर त्याच्याकरितां जें एकखांबी सिंहासन—मुद्दाम तयार केलें आहे त्याच्यावर!

आईचें सांत्वन करण्याकरितां स्थितप्रज्ञतेनें 'मातीचा मोहक पुतळा। जाईल पहा क्षणांत मातींत मिळुनी' असें तो म्हणत असला तरी लगेच 'वाईट वाटतें

इतुकें । तव सेवेला अंतरलों मी जननी । ' हे उद्गारहि त्याच्या तोंडून निघतात. तेज आणि कारुण्य यांचा हा संगम मनाला चटका लावल्याशिवाय राहात नाहीं.

पत्नीच्या दुःखाचा विचार त्याला मरणाहूनहि कठीण वाटतो, हें स्वाभाविकच आहे. तुकारामासारखे विष्णुदास काय, रामासारखे लोकोत्तर राजे काय, किंवा या तरुणासारखे मातृभूमीचे भक्त काय, सर्वांचीं अंतःकरणें विधात्यानें एकाच विलक्षण मिश्रणानें निर्माण केलेलीं असतात. फुलांहून मऊ, पण वज्राहून कठोर अशा या अंतःकरणांकडेच मानवता मोठ्या आशेनें पाहात असते.

या कवितेंतला धीरोदात्त नायक आईला नऊ महिन्यांनीं भेटण्याचें जें आश्वासन देतो तेंसुद्धां किती करुणरम्य आहे ! मरणोत्तर मिळणारा स्वर्ग त्याला तुच्छ वाटतो. तिथें एक क्षणसुद्धां दवडायला तो तयार नाहीं. मातृभूमीच्या पायीं आपलें जीवनपुष्प वाहतां यावें म्हणून पुन्हा याच भूमींत, याच आईच्या पोटीं जन्म मिळावा हीच त्याची शेवटची इच्छा !

● ● ●

मनिं धीर धरीं, शोक आवरी जननी
भेटेन नऊ महिन्यांनीं ।। ध्रु० ।।
या न्यायाची रीत मानवी असते
खरि ठरते केव्हां चुकते
किती दुर्दैवी प्राणी असतिल असले
जे अपराधाविण मेले
लाडका बाळ एकुलता
फांशीची शिक्षा होतां
कवटाळुनि त्याला माता
अति आक्रोशें रडते केंविलवाणी
भेटेन नऊ महिन्यांनीं ।। १ ।।

किति वेळ असा शोक करिसि गे असला
दे निरोप मज जायाला

होईल पहा विफल तुझा आक्रांत
बाहेर उभे यमदूत
ते चाकर सरकाराचे
नच उलटें काळिज त्यांचें
परि शरमिंदे अन्नाचे
तुजपासुनियां नेतिल मज ओढोनी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ २ ॥

तुज सोडुनि मी जाइन कां गे इथुन
परि देह परस्वाधीन

बघ बोलति हे बोल मुक्या भावाचे
मम दोरखंड दंडाचे

अन्नपाणि सेवुनि जिथलें
हें शरीर म्यां पोशियलें
परदास्यि देश तो लोळे
स्वातंत्र्य मला मिळेल मग कोठोनी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ३ ॥

कां परक्याला बोल उगिच लावावा
दैवानें धरिला दावा

लाभेल कधीं सांग कुणाला जगतीं
याजळत्या घरिं विश्रांती

घेउनी उशाला साप
येईल कुणाला झोंप
हा सर्व ईश्वरी कोप
ही परवशता करते भयंकर करणी
भेटेन नऊ महिन्यानीं ॥ ४ ॥

मज फांशीची शिक्षा दिधली जाण
न्यायाचा करुनी खून
या मरणाची मौज कशी बघ असते
सांगेन तुला मी, माते,
मी राजपुत्र दिलदार
घेउनी करीं समशेर
भोंवतीं शिपाई चार
करितील अतां स्वागत जन मैदानीं
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ५ ॥

मजसाठिं तिथें सिंहासन निर्मियलें
त्या एका खांबावरलें
मी वीर गडी चढेन गे त्यावरती
इतरांची नाहीं छाती
इच्छिली वस्तु द्यायाला
अधिकारी तैनातीला
प्राणापरि जपती मजला

या दुनियेची दौलत लोळे चरणीं
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ६ ॥

या सर्वांचें मजवर भारी प्रेम
देतील खडी ताजीम
हें वैभव मीं विकत घेतलें साचें
देउनी मोल जीवाचें
या गळ्यांतला गळफांस
देईल घडीभर त्रास
लाभेल मुक्ति जीवास
वरि जाइन मी लाथ जगा हाणोनी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ७ ॥

या देहाची करूं कशाला चिंता
होइल तें होवो आतां
कुणि करुणेचे सागर हळहळतील
कुणि हंसणारे हंसतील
अश्रूंनीं न्हाऊं घाला
प्रेमाचें वेष्टन त्याला
मातीचा मोहक पुतळा
जाईल पहा क्षणांत मातिंत मिळुनी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ८ ॥

सांगतों तुला शपथ घेउनी आई
मरणाला भ्यालों नाहीं

आठवी मनीं श्रीगीतेचें सार
कीं नश्वर तनु जाणार
हृदयाचे मोजुन ठोके
बघ शांत कसें आहे तें
वाईट वाटतें इतुकें
तव सेवेला अंतरलों मी जननी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ९ ॥

माउली तुझा नव्हे, नव्हे मी कुमर
पूर्वीचा दावेदार
तव सौख्याच्या वाटेवर निर्मियले
दु:खाचे डोंगर असले
नउ मास भार वाहून
बाळपणीं बहुपरि जपुन
संसार दिला थाटून
परि बनलों मी खचित अभागी प्राणी
भेटन नऊ महिन्यांनीं ॥ १० ॥

"मम बाळ गुणी वृद्धपणीं बहुसाल
आम्हांला सांभाळील"
तव ममतेचे बोल ऐकिले असले
परि सारें उलटें झालें
माउली विनंती तुजला
सांभाळ तिला, बाळाला
नच बघवे तिकडे मजला

हा कठिण गमे प्रसंग मरणाहूनी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ११ ॥

लाभतें जया वीर–मरण भाग्याचें
वैकुंठ–पदीं तो नाचे
दे जन्म मला मातृभूमिचे पोटीं
पुनः पुन्हा मरण्यासाठीं
मागेन हेंच श्रीहरिला
मातृभूमि उद्धरण्याला
स्वातंत्र्यरणीं लढण्याला
तव शुभ उदरीं जन्म पुन्हा घेवोनी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ १२ ॥

मग यमदूतें ओढुनि त्याला नेलें
व्हायाचें होउनि गेलें
परि त्या ठायीं शब्द उमटती अजुनी
भेटेन नऊ महिन्यांनीं
खांबाला फुटतिल फांटे
मृदुसुमसम होतिल कांटे
हिमगिरिला सागर भेटे
परि परवशता सुखकर झाली नाहीं
दे कुंजविहारी ग्वाही ॥ १३ ॥

—कवि कुंजविहारी

# आई

## परिचय

पावसाळ्यांत अनेकदां इंद्रधनुष्य दिसतें; पण कित्येकदां तें सारेंच अस्पष्ट असतें, कित्येकदां त्याची एकच बाजू अथवा एकच रंग उठावदार दिसतो. एखाद्या वेळींच त्याचा संपूर्ण सौंदर्यविलास पाहायला मिळतो. कवीच्या निर्मितीची स्थितिहि अशीच असते. त्याच्या कवितांत सुंदर गणलीं जाणारीं गीतें पुष्कळ असलीं तरी अमर थोडींच असतात ! 'आई' ही अशा विरळ कवितांपैकीं एक आहे. ग्रे या इंग्रज कवीनें '*Elegy in the Country Churchyard*' ही एकच कविता लिहिली असती तरी त्याचें नांव कुणीहि विसरला नसता ! यशवन्तांच्या या कवितेच्या बाबतींतहि तसेंच म्हणतां येईल.

या भावगीताची सुरुवातच किती हृदयस्पर्शी आहे. बाहेर कुणी तरी आपल्या आईला हांक मारीत आहे. पण तें संबोधन कानांवर पडतांच मातृप्रेमाला पारखा झालेला कवि व्याकुळ होतो. चिमण्या आणि गाई हे नेहमीं दृष्टीला पडणारे प्राणी ! पण त्यांचे नित्य व्यवहार पाहूनहि आपणाला आई नाहीं ही त्याची जाणीव अधिकच तीव्र होते.

'शाळेतुनी घराला' या कडव्यांतल्या वर्णनांत मातृदुःखाच्या उत्कटतेइतकेंच साध्या पण सुखी अशा हिंदु कुटुंबाचें सुंदर चित्र कवीनें किती मोजक्या रेषांत काढलें आहे. कवीची धाकटी बहीण ही देवाघरीं गेलेलीं भावंडें हिशेबांत धरून 'आम्ही सात आहों' असें सांगणाऱ्या वर्डस्वर्थच्या काव्यनायिकेइतकीच अजाण आहे. तिला मरणाची कल्पनाच नाहीं. पण लहान मुलांच्या सहज उद्गारांनीं मोठ्यांचें दुःख अधिकच वाढतें. 'आम्हांस नाहिं आई' या ताईच्या बाळबोलांत केवढें कारुण्य भरलें आहे !

पांचव्या कडव्यांत संस्कृत वाङ्मयांतल्या कल्पनांचा उपयोग करून कवीनें आईच्या मोठेपणाचें केलेलें वर्णन वाचनीय आहेच; पण त्यापेक्षांहि 'स्वामी

तिन्ही जगांचा । आईविना भिकारी ' ही पहिल्या कडव्यांतली ओळ आणि ' ये रागवावयाही । परि येइ येइ वेगें ' हा गीताचा शेवटचा चरण, या दोन ओळी विसरणारा मनुष्य—छे ! तो मनुष्य असणेंच शक्य नाहीं !

● ● ●

[ जाति–**रसना** ]

आई म्हणोनि कोणी
आईस हांक मारी
ती हांक यइ कानीं
मज होय शोककारी
नोहेच हांक मातें
मारी कुणी कुठारी
आई कुणा म्हणूं मी
आई घरीं न दारीं
ही न्यूनता सुखाची
चित्ता सदा विदारी
स्वामी तिन्ही जगांचा
आईविना भिकारी

चारा मुखीं पिलांच्या
चिमणी हळूच देई
गोठ्यांत वांसरांना
ह्या चाटतात गाई
वात्सल्य हें पशूंचें
मी रोज रोज पाहीं

पाहून अन्तरात्मा
व्याकूळ मात्र होई
वात्सल्य माउलीचें
आम्हां जगांत नाहीं
दुर्भाग्य याविना का
आम्हांस नाहिं आई

शाळेंतुनी घराला
येतां धरील पोटीं
काढून-ठेविलेला
घालील घांस ओठीं
उष्टया तशा मुखाच्या
धावेल चुम्बना ती
कोणी तुझ्याविना गे
का ह्या करील गोष्टी ?
तूझ्याविना न कोणी
लावील सांजवाती
सांगेल ना म्हणाया
आम्हां 'शुभम् करोति'

ताईस या कशाची
जाणीव कांहिं नाहीं
त्या सान बालिकेला
समजे न यांत कांहीं

पाणी तरारतांना
नेत्रांत बावरे ही
ऐकूनि घे परंतु
"आम्हांस नाहिं आई"
सांगे तसें मुलींना
"आम्हांस नाहिं आई"
ते बोल येति कानीं
"आम्हांस नाहिं आई"

आई ! तुझ्याच ठायीं
सामर्थ्य नन्दिनीचें
माहेर मंगलांचें
अद्वैत तापसांचें
गाम्भीर्य सागराचें
औदार्य या धरेचें
नेत्रांत तेज नाचे
त्या शान्त चन्द्रिकेचें
वात्सल्य गाढ पोटीं
त्या मेघमण्डळाचें
वास्तव्य या गुणांचें
आई, तुझ्यांत साचें
गुम्फून पूर्वजांच्या
मीं गाइलें गुणांला

ग्रंथ संग्रहालय,
विभाग
क्रमांक
नों. दि.

साऱ्या सभाजनांनीं
या वानिलें कृतीला
आई, करावया तूं
नाहींस कौतुकाला
या न्यूनतेमुळें ही
मज त्याज्य पुष्पमाला
पंचारती जनांची
ना तोषवी मनाला
परि जीव बाळकाचा
तव कौतुका भुकेला

येशील तूं घराला
परतून केधवां गे
दवडूं नको घडीला
ये ये निघून वेगें
हे गुन्तले जिवाचे
पायीं तुझ्याच धागे
कर्तव्य माउलीचें
करण्यास येइ वेगें
रुसणार मी न आतां
जरि बोलशील रागें
ये रागवावयाही
परि येइ येइ वेगें.

—कवि यशवन्त

# देशाचा संसार

## परिचय

सेनापती बापट यांच्या या अभंगांत देशासाठीं अहोरात्र तळमळणाऱ्या त्यांच्या हृदयाचें प्रतिबिंब पडलेलें आहे. शिक्षणाकरितां बापट विलायतेंत गेले होते. तेव्हां एका इंग्रज तरुणीवर त्यांचें प्रेम बसलें होतें; पण त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे, "माझ्या डोळ्यांसमोर तेवढाच प्रश्न नव्हता. देश, समाज यांनीं मला पछाडलें होतें. त्यामुळें अंतीं भावनांवर मीं विजय मिळविला." तारुण्यसुलभ प्रेमभावनेपेक्षां त्यांच्या मनांतील देशभक्तीच त्या वेळीं सुद्धां प्रभावी ठरली. देशभक्तीच्या उत्कट भावनेच्या भरांत त्यांनीं पुष्कळ कविता लिहिली आहे. त्यांचें देशासाठीं तळमळणारें हृदय त्यांना स्वस्थ बसूंच देत नाहीं. मात्र तळमळीच्या सहजस्फूर्त उद्गारांना काव्यदृष्टीनें नटविण्याकडे अथवा त्यांची मोहकता वाढावीं असे प्रयत्न करण्याकडे बापटांचें मुळींच लक्ष नाहीं. त्यांचा पोषाक जेवढा साधा आहे, तेवढीच त्यांची कविताहि साधी आहे. या साधेपणांत तळमळीचें जें सौंदर्य आहे, तोच त्यांच्या कवितेचा मुख्य गुण.

आपआपल्या संसारांत दंग असलेल्या प्रत्येकाला बापट कळवळून विनवणी करतात—

" देशाचा संसार । माझे अंगावरी,
ऐसें थोडें तरी । वाटूं द्या हो ॥ "
" सत्य सत्य माझी । विद्याशक्ति थोडी,
परि देवा गोडी । भक्तांचीच ॥ "

हे उद्गार किती अर्थपूर्ण आहेत ? आमचें तत्त्वज्ञान, आमची संस्कृति, आमचें वाङ्मय अनेक गुणांनीं संपन्न असलें तरी त्या सर्वांत एक मोठें वैगुण्य आहे—सामाजिक मनोवृत्तीचा अभाव ! बापटांनीं या वैगुण्यावर कवितेच्या आरंभींच अचूक बोट ठेवलें आहे.

भक्ति हीच जगांतली सर्वांत मोठी शक्ति आहे ही सेनापतींची श्रद्धा त्यांच्या कार्याप्रमाणें त्यांच्या अभंगांतहि स्पष्टपणें दिसते. यामुळें कोणत्याहि प्रकारचा बौद्धिक अथवा भावनात्मक शृंगार नसतांना त्यांचे साधे–सुधे अभंग वाचनीय वाटतात.

● ● ●

[ अभंग ]

देशाचा संसार, माझे अंगावरी
ऐसें थोडें तरी, वाटूं द्या हो ।

वाटूं द्या हो थोडें–तरी प्रत्येकासी
माझी कासाविसी याचसाठीं ।

याचसाठीं तुम्हां, हात जोडीतसें
कोणी म्हणतसे, वेडा झाला ।

वेडा झाला देश-माउलीचेसाठीं
होतें पुण्य गांठीं; हेंचि खरें ।

हेंचि खरें देवा आवडता झालों,
तणें निवडिलों देशसेवे ।

देशसेवेसाठीं व्हावेत सगळे,
ज्यांना ज्यांना कळे, धर्मतत्त्व ।

धर्मतत्त्व तेंचि, जो का उपकार,
त्याचाचि आधार सज्जनांसी ।

सज्जनांसी चहूं-कडूनि टोंचिती,
कितीक छळिती छळक ते ।

छळक ते अंतीं मनीं पस्तावती
सज्जनाची शांति, देखोनियां ।

देखोनियां शांति, कारण शोधीती
तेथ आलोकिती भूतदया ।

भूतदया बीज, उपकार फळ,
शांति ते अढळ, उपकारीं ।

उपकारीं ज्यांना, सार्थकता वाटे
सोशिती चपेटे, संकटाचे ।

संकटाचे काळीं, हृदयनिवासी
आपुल्या भक्तासी, धीर देई ।

धीर देई कीं जो, पर–उपकार,
तोचि तो साचार, धर्मतत्त्व ।

धर्मतत्त्व ज्यांनीं आपुलेंसें, केलें
त्यांसी बोलाविलें, देशसेवे !

देशसेवेसाठीं, राबावें कांहींसें
हेंचि मज पिसें, सत्य सत्य ।

सत्य सत्य माझी, विद्याशक्ति थोडी,
परी देवा गोडी, भक्तीचीच ।

भक्तीचीच गोडी, सुदाम्याचे पोहे
गोड करीताहे, हरिमुखीं ।

हरिमुखीं मीही, घालीतसे पोहे
मूठ भरी तो हे स्वीकारीत ।
स्वीकारीत भावें, केली देशसेवा
मज शांतिमेवा, वाढीतसे ।
वाढीतसे हरी मोक्षाचें वाढणें
ज्यासी ज्यासी येणें, त्यानें यावें ।
यावें यावें ऐसी, हाक दे लोकांसी
ऐसें मजपासीं, हरि बोले ।
हरि बोले मी तों बोलावणेंकरी
तुम्हांसी पाचारी, हरीसाठीं ।
हरीसाठीं तुम्हां, बोलवणें केलें,
आले वा न आले, मज काय ।
मज काय मी तों, सेवक हरीचा
वेडापिसा त्याचा, त्यासी गोड ।
त्यासी गोड व्हाल, जेणें तें तुम्हांसी
गूढ सज्जनांसी, सांगीतलें ।
सांगीतलें कीं त्या, सेवा-अनुरक्त,
आवडतो भक्त, स्वदेशाचा ।

—सेनापति बापट

## वहिनीस पत्र

### परिचय

हें पत्र काव्य–वाङ्मयांत एका दृष्टीनें अपूर्व आहे. काव्यांत संदेश अथवा पत्रें पाठविलीं जातात तीं सामान्यतः वल्लभ अथवा वल्लभा असें नातें असलेल्या व्यक्तीकडून. विरहानें होणाऱ्या दुःखाचें वर्णन हा असल्या काव्यांचा एकमेव विषय. पण हें पत्र एका दिरानें आईच्या मायेनें आपल्याला वाढविणाऱ्या वडील भावजयीला उद्देशून लिहिलें आहे. दिरानें भावजयीला रसोत्कट पत्र लिहिणें जेवढें अपूर्व, तेवढाच हा कवितेचा विषयहि नवीन आहे. देशासाठीं बलिदान करायला तयार झालेला दीर आपल्या वडील वहिनीला सांगतो—

> ‘ अमर होय ती वंशलता । निर्वंश जीचा देवाकरितां ।।
> दिगंतीं पसरे सुगंधता । लोकहित-परिमलाची ।।’

सामान्य मनुष्याच्या सुखाच्या कल्पनेहून असामान्य मनुष्याची सुखाची कल्पना किती भिन्न असते हें या ओवीवरून दिसून येईल. गजेंद्रानें श्रीविष्णूसाठीं आपल्या सोंडेंत घेतलेल्या कमलपुष्पाचा जो उल्लेख कवीनें केला आहे तोहि अत्यंत मार्मिक आहे. ‘ सुकुमार आमुच्या अनंत फुलां ’ व ‘ एकदां नवरात्र संपली ’ या दोन ओव्या वाचतांना सावरकरांच्या तेजस्वी व्यक्तिमत्तेतून त्या स्फुरल्या आहेत हें सांगण्याची आवश्यकताच राहात नाहीं.

सावरकरांनीं ज्या काळीं आपल्या पूज्य भावजयीला हें पत्र पाठविलें त्या काळीं कुटुंबाच्या चार भिंतींपलीकडे स्त्रीची दृष्टि सहसा जात नसे. अशा स्थितींत त्यांनीं ‘ तूं धैर्याची अससी मूर्ति । माझे वहिनी माझे स्फूर्ति । ’ असे ज्या स्त्रीविषयीं उद्‌गार काढले तिचें व्यक्तिमत्त्व निःसंशय अलौकिक असलें पाहिजे. देशाच्या पायीं करावें लागणारें बलिदान ही जणूं कांहीं या कुटुंबाच्या नित्यक्रमांतलीच एक गोष्ट होती, असा हें पत्र वाचतांना भास होतो. व्यक्तिमत्तेवांचून

वाङ्मय परिणामकारक होऊं शकत नाहीं, किंवा वाङ्मयाची सजीवता लेखकाच्या जीवनांतूनच उत्पन्न होत असते या विधानाचें उत्तम प्रत्यंतर म्हणजे अशा प्रकारची कविता.

● ● ●

— १ —

जयासी तुवां प्रतिपाळिलें। मातेचें स्मरण होऊं न दिलें ॥
श्रीमती वहिनी वत्सले। बंधु तुझा तो तुज नमी ॥ १ ॥

आशिर्वाद–पत्र पावलें। जें लिहिलें तें ध्यानीं आलें ॥
मानस प्रमुदित झालें। धन्यता वाटली अुदंड ॥ २ ॥

धन्य धन्य आपुला वंश। सुनिश्चयें ओीश्वरी अंश ॥
कीं रामसेवा पुण्यलेश। आपुल्या भाग्यीं लाधला ॥ ३ ॥

— २ —

अनेक फुलें फुलतीं। फुलोनियां सुकोनि जातीं ॥
कोणी त्यांची महती गणती। ठेविली असे ॥ ४ ॥

परी जें गजेंद्रशुंडेनें अुपटिलें। श्रीहरीसाठीं मेलें ॥
कमल फूल तें अमर ठेलें। मोक्षदायी पावन ॥ ५ ॥

त्या पुण्य गजेंद्रासमची। मुमुक्षु स्थिती भारतीची ॥
करुणारवें ती याची। अिंदीवर श्यामा श्रीरामा ॥ ६ ॥

स्वोद्यानीं तिनें यावें। आपुल्या फुलांस भुलावें ॥
खुडोनियां अर्पण करावें। श्रीरामचरणां ॥ ७ ॥

धन्य धन्य आपुला वंश। सुनिश्चयें ओीश्वरी अंश ॥
श्रीरामसेवा पुण्यलेश। आपुल्या भाग्यीं लाधला ॥ ८ ॥

— ३ —

अशींच सर्व फुलें खुडावीं । श्रीरामचरणीं अर्पण व्हावीं ।।
कांहीं सार्थकता घडावी । या नश्वर देहाची ।। ९ ।।

अमर होय ती वंशलता । निर्वंश जीचा देवाकरितां ।।
दिगंतीं पसरे सुगंधता । लोकहित–परिमलाची ।। १० ।।

सुकुमार आमुच्या अनंत फुलां । गुंफोनि करा हो सुमन-माला ।।
नवरात्रीच्या नवकाला । मातृभूमी वत्सले ।। ११ ।।

अेकदां नवरात्र संपली । नवमाला पूर्ण झाली ।।
कुलदेवी प्रकटेल कालीं । विजया लक्ष्मी पावन ।। १२ ।।

— ४ —

तूं धैर्याची असली मूर्ति । माझे वहिनी माझे स्फूर्ति ।।
रामसेवाव्रताची पूर्ति । ब्रीद तुझें आधींच ।। १३ ।।

महत्कार्याचें कंकण धरिलें । आतां महत्तमत्व पाहिजे बाणलें ।।
अैसें वर्तन पाहिजे केलें । कीं जें पसंत पडलें संतांना ।। १४ ।।

अनेक पूर्वज ऋषीश्वर । अजात वंशजांचे संभार ।।
साधु साधु गर्जतील । अैसें वर्तणें या काला ।। १५ ।।

—वि. दा. सावरकर

# अश्रु

## परिचय

मृदुता हा साने गुरुजींच्या लिखाणाचा आत्मा असून या कवितेच्या कल्पनेचा उगमहि अशाच प्रकारच्या कोमल भावनेंतच झाला आहे.

जगांत देणें आणि दुखणें यांच्याप्रमाणें रडणेंसुद्धां कुणाला नको असतें. असें असतांना ‘ नको माझा अश्रु कधीं नेऊं देवा ’ ही कवीची विनवणी ऐकली कीं क्षणभर मन विस्मित होतें. वाटतें—अश्रूंची हौस ही कविमनाची विकृति असावी !

पण कवीला ज्या अश्रूंनीं आपल्याला सोडूं नये असें वाटतें ते दुबळेपण दर्शविणारे नाहींत. दुसऱ्यासाठीं रडणें म्हणजे एका दृष्टीनें लढणेंच आहे असें त्याला मनःपूर्वक वाटतें. माणसें स्वतःसाठीं नेहमींच रडतात. पण स्वतःच्या पायांत कांटा मोडला तर त्यांच्या डोळ्यांत जेवढें पाणी उभें राहतें तेवढें शेजारचा मनुष्य अपघातानें मेला तरी सुद्धां त्यांच्या डोळ्यांत दिसणार नाहीं.

कवीला असले दुबळे स्वार्थी अश्रु नको आहेत. माणुसकीची पताका म्हणून ज्यांच्याकडे बोट दाखवितां येईल अशा अश्रूंसाठीं तो आसावलेला आहे. ‘ अश्रूंच्या बिंदूंत माझा सुखसिंधु ’ असें तो म्हणतो तें याच अर्थानें. दुसऱ्यासाठीं डोळ्यांत उभे राहणारे अश्रु हीं मनुष्याच्या आत्मविकासाच्या वेलीवर फुललेलीं फुलेंच नव्हेत का ?

अश्रुबिंदूला लहान म्हणून हिणविणारांना ‘ इवलासा अश्रु नका मानूं तुच्छ ’ या ओळीपासून आरंभ होणाऱ्या भागांत कवीनें दिलेलें उत्तर त्याच्या कल्पकतेची चमक आणि अभिजात रसिकता दर्शविण्याला समर्थ आहे.

● ● ●

नको माझा अश्रु कधीं नेऊं देवा हाचि थोर ठेवा माझा एक
बाकी सारें नेई धन-सुख-मान परी हे लोचन राखी ओले
माझें रूप मज अश्रू दावितात हेचि तात मात प्राणदाते
अश्रू माझे थोर ज्ञानदाते गुरु अश्रु कल्पतरु माझे खरे
अश्रू माझे मला गोड हंसवितील अश्रू भेटवितील माझें ध्येय
अश्रु माझा जीव अश्रु माझा प्राण देवा त्यांच्यावीण न जगेन
अश्रू वांचवीती अश्रू हांसवीती माझा फुलवीती जीवनतरु
अश्रूंच्या बिंदूंत माझा सुखसिंधु नको तो गोविंदु नेऊं कधीं
सगळें हें जग तिरस्कार करी सखा माझा परी अश्रु एक
अश्रूस पूजीन अश्रूस ठेवीन मनीं सांठवून अहोरात्र

● ● ●

इवलासा अश्रु पर्वत बुडवी जीवाला चढवी मोक्षपदीं
इवलासा अश्रु परी वज्रा चुरी पाषणाचें करी नवनीत
इवलासा अश्रु खारट आंबट निर्मीत अवीट सुधासिंधु
इवलासा अश्रु ओलावा तो किती? अमित पिकवी माझे मळे
इवलासा अश्रु परी त्याच्या पोटीं कोटचवधि गोष्टी सांठलेल्या
इवलासा अश्रु परी बोले किती देवी सरस्वती तेथें मूक

● ● ●

इवलासा अश्रू नका मानूं तुच्छ संसारीं महोच्च स्थान त्याचें
इवलासा तारा दिसतो दुरून परी तो मोजून कोण येई ?
बाळकृष्णाचें तें इवलेंसें तोंड यशोदा ब्रह्मांड देखे त्यांत
इवलीशी मूर्ति बटु वामनाची परी त्रैलोक्याची केली मिति
इवलेंसें पान पांचाळी अर्पित स्वामी तृप्त होत ब्रह्मांडाचा
इवलेंसें पान रुक्मिणी ठेवीत लीलेनें तुळीत विश्वंभरा
इवलासा अश्रु तसा माझा आहे सारें त्यांत राहे भाग्य माझें

● ● ●

इवलासा अश्रु अपूर्णाला पूर्ण करीतसे तूर्ण सांगूं काय
इवलासा अश्रु पूर्ण विरामाला जीवनग्रंथाला गोड देई
इवलासा अश्रु माझा मज असो वियोग तो नसो त्याचा कधीं
इवलासा अश्रु जों माझ्याजवळ तोंवरी सकळ भाग्य माझें

● ● ●

अश्रु माझी आशा अश्रू माझें बाळ अश्रु हा निर्मळ जवळ असो
अश्रु हा लहान अश्रु हा महान अश्रु नारायण आहे माझा
पोटांत ठेवीन डोळयांत ठेवीन मी ना विसंबेन त्याला कधीं

—साने गुरुजी

# सागरास

## परिचय

मातृभूमीच्या विरहानें व्याकुळ झालेलें कविमन तिच्या दर्शनाला उत्सुक झालें आहे. ज्या सागरानें आपल्याला विद्यार्जनाकरितां परदेशीं आणलें त्यानेंच आपल्याला परत नेऊन पोंचवावें अशी त्याची अपेक्षा आहे.

परदेशीं गेलेल्या प्रत्येक मनुष्याला चुकल्याचुकल्यासारखें होतें, राहून राहून आपल्या जन्मभूमीची आठवण होते. स्वप्नांत आपण आपल्या मातृभूमींत किंबहुना प्रियजनांत आहोंत असा त्याला भास होतो. कविमन अधिक भावनाशील असल्यामुळें जन्मभूमीच्या वियोगाचें दुःख त्याला अधिकच जाणवावें यांत अस्वाभाविक असें काय आहे ?

मात्र या कवितेंतल्या विरहदुःखांतहि सावरकरांचें तेजस्वी वैशिष्ट्य आहे. ज्या ज्या विद्येचा उपयोग मातृभूमीच्या उद्धाराकरितां होत नाहीं ती विद्या त्यांना भारभूत वाटते.

> नभिं नक्षत्रें बहुत एक परि प्यारा ।
> मज भरतभूमिचा तारा ॥
> प्रासाद इथें रम्य परी मज भारी ।
> आईची झोंपडी प्यारी ॥ १ ॥

या ओळी, स्कॉटच्या

> "*Breathes there the man, with soul so dead*
> *Who never to himself hath said,*
> *This is my own, my native land.*"

या ओळींप्रमाणें मनांत सदैव घोळत राहतील अशा आहेत.

कल्पनारम्यता हाहि या कवितेचा एक विशेष आहे. आपण मातृभूमीच्या दर्शनासाठीं किती तळमळत आहों याची सागराला कल्पना येणार नाहीं म्हणून

त्याला नदीच्या विरहाची शपथ घालणें आणि आंग्लभूमीला स्वामिनी मानणारा समुद्र आपल्या परतंत्र मातृभूमीची पर्वा करीत नसावा या शंकेनें त्याला अगस्तीची भीति दाखविणें या दोन्ही कल्पनांत मूळ भावनेला पोषक असाच चमत्कृति-विलास आहे. सावरकरांनीं ज्या वेळीं ही कविता लिहिली त्या वेळीं हिंदुस्थानचें राजकीय आकाश काळ्याकुट्ट मेघांनीं व्यापून टाकलें होतें. ती पार्श्वभूमि पाहिली म्हणजे या गीताच्या लोकप्रियतेचें मर्म सहज लक्षांत येतें.

● ● ●

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा प्राण तळमळला ।। ध्रु० ।।
भूमातेच्या चरणतलां तूं धूतां । मीं नित्य पाहिला होता ।
मज वदलासी अन्य देशिं चल जाऊं । सृष्टिची विविधता पाहूं ।
तैं जननी-हृद् विरह-शंकितहि झालें । परि तुवां वचन तिज दिधलें ।
मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठि वाहीन । त्वरित या परत आणीन ।
चालः—गंभीर त्वदाकृति बघुनी ।। मी ।।
विश्वसलों या तव वचनीं ।। मी ।।
जगदनुभव-योगें बनुनी ।। मी ।।
येईन त्वरें कथुनि सोडिलें तिजला । सागरा प्राण तळमळला ।।१।।

शुक पंजरिं कीं हरिण शिरावा पाशीं । ही फसगत झाली तैशी ।
भूविरह कसा सतत साहुं या पुढती । दशदिशा तमोमय होती ।
गुणसुमनें मीं वेंचियलीं या भावें । कीं तिनें सुगंधा घ्यावें ।
जरि उद्धरणीं व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा ।
चालः—ती आम्रवृक्ष वत्सलता ।। रे ।।
नव कुसुमयुता त्या सुलता ।। रे ।।
तो बाल गुलाबहि आतां ।। रे ।।
फुलबाग मला हाय पारखा झाला । सागरा प्राण तळमळला ।। २ ।।

नभिं नक्षत्रें बहुत अेक परि प्यारा। मज भरतभूमिचा तारा।
प्रासाद अिथें रम्य परी मज भारी। आअिची झोंपडी प्यारी।
तिजवीण नको राज्य मज प्रिय साचा। वनवास तिच्या जरि वनिचा।।
चालः—भुलविणें व्यर्थ हें आतां।। रे।।
बहु जिवलग गमतें चित्ता।। रे।।
तुज सरित्पते जी सरिता।। रे।।
तद्विरहाची शपथ घालितों तुजला। सागरा प्राण तळमळला।।३।।

या फ़ेनमिषें हंससि निर्दया कैसा। कां वचन भंगिसी अैसा।
त्वत्स्वामित्वा संप्रति जी मिरवीते। धुकुनि कां आंग्ल-भूमीतें।
मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी। मज विवासनेतें नेसी।
चालः—जरि आंग्लभूमि भयभीता।। रे।।
अबला न माझि ही माता।। रे।।
कथिल हें अगस्तिस आतां।। रे।।
जो आचमनीं अेक क्षणीं तुज प्याला। सागरा प्राण तळमळला।।४।।

—वि. दा. सावरकर

## माझें मृत्युपत्र

### परिचय

जुनें वृत्त व मधूनमधून आढळणारी संस्कृतप्रचुर रचना यांच्यामुळें बाह्यतः ही कविता एकोणिसाव्या शतकाअखेर संस्कृत वळणाच्या मराठी कवितेसारखी वाटते. पण अंतरंगांत शिरलें, कीं तिचा नाविन्यपूर्ण आत्मा पाहून मन चकित होतें. हें मृत्युपत्र सावरकरांनीं आपल्या वहिनीला उद्देशून लिहिलें आहे. कवितेच्या पहिल्या भागांत गतकालांतील स्मृतिचित्रांचा जो उल्लेख आला आहे तो उत्तररामचरितांत आपल्या मागील आयुष्याचा चित्रपट पाहतांना राम आणि सीता यांचा जो संवाद होतो त्याच्याइतकाच सरस आहे. मात्र या स्मृतिचित्रांत प्रीतीचें माधुर्य नाहीं; तर देशभक्तीचा तेजस्वीपणा आहे. ‘ तो काल रम्य ’ आणि ‘ झाल्या तदा प्रियकरांसह ’ या दोन श्लोकांची ‘ स्मरसि सुतनु ’ आणि ‘ अलसलालित मुग्धा ’ या उत्तररामचरितांतील श्लोकांशीं तुलना करून पाहणें मोठें मौजेचें आहे.

दुसऱ्या भागांत आठ वर्षांपूर्वीं मातृभूमीच्या मुक्ततेचीं आपण पाहिलेलीं स्वप्नें खरीं होऊं लागलीं म्हणून कवीला होणारा आनंद व्यक्त झाला आहे. या आनंदाच्या भरांत स्वातंत्र्यदेवता प्रसन्न व्हावी म्हणून ज्या आहुति दिल्या जात आहेत त्यांतील आपणहि एक आहों याचें दुःख क्षणभरहि त्याला होत नाहीं. किंबहुना पहिली आहुति होण्याचा मान आपल्याला मिळाला याचाच त्याला आनंद वाटत आहे. ‘ आमंत्रण प्रभु रघूत्तम सोडितां हें ’ या श्लोकांत कवीची ही तेजस्वी मनोवृत्ति पूर्णपणें प्रतिबिंबित झाली आहे.

तिसऱ्या भागांत कवीची मातृभूमीवरील भक्ति किती असामान्य आहे हें दिसून येतें. आपण तिघेहि भाऊ स्वातंत्र्यसंग्रामांत बळी जात आहोंत याबद्दल कविमन क्षणभरहि उदास होत नाहीं. उलट तें उफाळून उद्गारतें :—

‘ हें काय बंधु असतों जरि सात आम्ही
त्वत्स्थंडिलींच असते दिधले बळी मीं । ’

चवथ्या भागांत कवीनें हिमालयांत तप करणाऱ्या निग्रही पार्वतीचा आणि स्वतःला आनंदानें जाळून घेणाऱ्या रजपूत स्त्रियांचा दिव्य आदर्श स्वतःपुढें ठेवण्याची आपल्या भावजयीला विनंति केली आहे.

‘ बुद्धयाचि वाण धरिलें करिं हें सतीचें ’ ही कवितेंत पुनःपुन्हा आवृत्त झालेली ओळ जणूं कांहीं तिचें सारसर्वस्वच आहे. ज्या कविता वाचतांना मनांतली फुलें फुलतात अशा कविता मराठींत पुष्कळ आहेत; पण मनांतले निखारे फुलविणारी असली कविता मात्र क्वचितच आढळते.

● ● ●

वैशाखिचा कुमुदनाथ नभांत हांसे ॥
यच्चंद्रिका धवल सौधतलीं विलासे ॥
घाली स्वयें जल जिला प्रिय बाल लोभें ॥
जाई फुलें परिमलें सुमनांत शोभे ॥ १ ॥

आले घरीं सकल आप्त सुहृद् जिवाचे ॥
आनंदमग्न कुल गोकुल काय साचें ॥
आदर्श दीप्ति-शुचिता-धृति-यौवनांचें ॥
पाहूनि जें तरुण मंडळ कीर्ति नाचे ॥ २ ॥

प्रेमें हृदें विकसलीं नव यौवनाच्या ॥
गंधें सुवासित अुदात्त सुसंस्कृतीच्या ॥
दिव्या लता तरुंसि जें गृह बाग झाला ॥
ज्या पौर हर्षित वदे जन ‘ धर्मशाला ’ ॥ ३ ॥

सैंपाक त्वां निजकरें कुशले, करावा ॥
प्रेमें तुझ्या अधिकची सुरसाल व्हावा ॥
संवाद सर्व मिळुनी करितां नितांत ॥
जेवावयासि बसलों जअि चांदण्यांत ॥ ४ ॥

श्रीरामचंद्र-वनवास कथारसाला ॥
कीं केंवि देश अिटली रिपुमुक्त झाला ॥
तानाजिचा समरधीर तसा पवाडा ॥
गात्रा चितोरगड वा शनवारवाडा ॥ ५ ॥

झाली कशी प्रियकरा अपुली अनाथा ॥
दुर्दास्यखिन्न शरभिन्न विपन्न माता ॥
शोकें विवंचुनि तिच्या जअि मोचनाचे ॥
केले अनंत तरुणां अुपदेश साचे ॥ ६ ॥

तो काळ रम्य, मधुरा प्रिय संगती ती ॥
तें चांदणें, नवकथा-रमणीय रात्री ॥
तें ध्येय दिव्य निजमातृविमोचनाचें ॥
तो अुग्र निश्चयहि, ते अुपदेश साचे ॥ ७ ॥

झाल्या तदा प्रियकरांसह आणभाका ॥
त्या सर्व देवि वहिनी स्मरती तुम्हां कां ? ॥
'बाजी प्रभू ठरूं' वदे युवसंघ सर्व ॥
'आम्ही चितोरयुवती,' युवती सगर्व ॥ ८ ॥

कीं घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेनें ॥
लब्धप्रकाश अितिहास-निसर्ग मानें ॥
जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें ॥
बुद्धयाचि वाण धरिलें करिं हें सतीचें ॥ ९ ॥

— २ —

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका ॥
त्यांतें स्मरोनि मग सांप्रत हें विलोका ॥

नाहीं पुरीं अुलटलीं जरि आठ वर्षें ॥
तों कार्यसिद्धि अितुकी मन कां न हर्षे ॥ १० ॥

आसेतुपर्वत अुचंबळला स्वदेश ॥
वीराकृती धरित टाकुनि दीनवेष ॥
भक्तांचिया रघुपदीं झुलताति झुंडी ॥
जाज्वल्य होयहि हुताशन यज्ञकुंडीं ॥ ११ ॥

तो यज्ञ सिद्ध करण्यास्तव अुग्र दीक्षा ॥
जे घेति येअि तअि तत्कृतिची परीक्षा ॥
" विश्वाचिया अखिल मंगल धारणाला ॥
बोला असे कवण भक्ष्य हुताशनाला " ॥ १२ ॥

आमंत्रण प्रभु रघूत्तम सोडितां हें ॥
दिव्यार्थ, देव ! अमुचें कुल सज्ज आहे ॥
हे साध्वि गर्जुनि असें पहिल्या हवीचा ॥
हा अीश्वरी मिळविला अम्हि मान साचा ॥ १३ ॥

धर्मार्थ देह वदलों ठरलें नितांत ॥
ते बोल फोल नच बालिश बायकांत ॥
ना भंगली भिअुनियां धृति यातनांना ॥
निष्काम कर्मरति योगहि खंडिला ना ॥ १४ ॥

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका ॥
केल्याच सत्य कृतिनी अजि ह्या विलोका ॥
दीप्तानलांत निजमातृविमोचनार्थ ॥
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलों कृतार्थ ॥ १५ ॥

— ३ —

हे मातृभूमि तुजला मन वाहियेलें ॥
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेलें ॥
तूंतेंचि अर्पिलि नवी कविता रसाला ॥
लेखांप्रती विषय तूंचि अनन्य झाला ॥ १६ ॥

त्वत्स्थंडिलीं ढकलिलें प्रिय मित्रसंघा ॥
केलें स्वयें दहन यौवन देह-भोगा ॥
त्वत्कार्य नैतिक सुसंमत सर्व देवां ॥
तत्सेवनींच गमली रघुवीर-सेवा ॥ १७ ॥

त्वत्स्थंडिलीं ढकलिली गृह-वित्त-मत्ता ॥
दावानलांत वहिनी नवपुत्र कांता ॥
त्वत्स्थंडिलीं अतुल-धैर्य वरिष्ठ बंधू ॥
केला हवी परमकारुण पुण्यसिंधू ॥ १८ ॥

त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला ॥
त्वत्स्थंडिलींच बघ अतां मम देह ठेला ॥
हे काय बंधु असतों जरि सात आम्ही ॥
त्वस्थंडिलींच असते दिधले बळी मीं ॥ १९ ॥

संतान या भरतभूमिस तीस कोटी ॥
जे मातृभक्ति-रत-सज्जन धन्य होती ॥
हें आपुलें कुलहि त्यांमधि ओश्वरांश ॥
निर्वंश होउनि ठरेल अखंड वंश ॥ २० ॥

— ४ —

कीं तें ठरोहि अथवा न ठरो परंतू ॥
हे मातृभू, अम्हि असों परिपूर्णहेतू ॥
दीप्तानलांत निजमातृ-विमोचनार्थं ॥
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलों कृतार्थ ॥ २१ ॥

ऐसें विवंचुनि अहो वहिनी व्रतातें ॥
पाळोनि वर्धन करा कुल–दिव्यतेतें ॥
श्रीपार्वती तप करी हिमपर्वतीं ती ॥
कीं विस्तवांत हंसल्या बहु राजपूती ॥ २२ ॥

तें भारतीय अबलाबल तेज कांहीं ॥
अद्यापि या भरतभूमित लुप्त नाहीं ॥
हें सिद्ध होअिल असेंचि उदार उग्र ॥
वीरांगने, तव सुवर्तन हो समग्र ॥ २३ ॥

माझा निरोप तुज येथुनि हाचि देवी ॥
हा वत्स वत्सल तुझ्या पदिं शीर्ष ठेवी ॥
सप्रेम अर्पण असो प्रणती तुम्हांतें ॥
आलिंगन प्रियकरा मम अंगनेतें ॥ २४ ॥

कीं घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेनें ॥
लब्धप्रकाश अितिहास-निसर्ग-मानें ॥
जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें ॥
बुद्ध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें ॥ २५ ॥

—वि. दा. सावरकर

# एक प्रसंग

## परिचय

माडखोलकरांनीं कविता थोडीच लिहिली आहे. या थोड्या कवितांचें वर्गीकरण केलें तर त्यांत राष्ट्रीय कवितांची संख्या अधिक भरेल. ‘ एक प्रसंग ’ ही मात्र करुणरम्य सामाजिक कविता आहे.

‘ अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न ’ ही कविता केशवसुतांनीं ज्या भावनेनें लिहिली तीच भावना या कवितेंतहि आहे. एका मनुष्यानें दुसऱ्याला अस्पृश्य लेखावें ही गोष्ट तत्त्वज्ञानाच्या, संस्कृतीच्या अथवा भावनेच्या दृष्टीनें कुणाला योग्य वाटेल ? पण हिंदु समाज मोठा दुर्दैवी आहे. आचारांचा विचारांशीं किंवा सामाजिक प्रगतिशीं निकटचा संबंध आहे हें त्याला किती तरी पिढ्या कळलेंच नाहीं !

कवीनें कारुण्य वाढविण्याकरितां या कवितेंत अस्पृश्य मुलीचें चित्र दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर रंगविलें आहे. धान्याच्या वखारीच्या दाराबाहेर, येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडे भिरीभिरी पाहात राहणाऱ्या आणि त्यांच्यापुढें पदर पसरून मूठभर दाण्यांची भीक मागणाऱ्या दलित मुलीचें हें चित्र माडखोलकरांनीं मोठ्या सहृदयतेनें चित्रित केलें आहे, यांत शंका नाहीं. ‘ घरीं चिमण्या ज्या खेळती अनेक । पोर तुमची मी त्यांत असे एक । ’ किंवा ‘ देह माझा हा इथें उभा आहे । जीव माझा त्या जिवलगांसि पाहे ’ या ओळींतली भावना किती हृदयस्पर्शी आहे !

कवितेचा शेवट मात्र कृत्रिम वाटतो. कविता परिणामकारक करण्याकरितां महाराच्या मुलीनें एका ब्राह्मणाचे पाय धरले. तो वेदोनारायण अस्पृश्यस्पर्शानें चिडून गेला आणि त्यानें तिला लाथ मारतांच त्या पोरीचा प्राण गेला अशी घटना कवीनें कल्पिली असली तरी ती खरी वाटत नाहीं. मृत्यूचें दुःख सर्वांत मोठें कुणाला ? सुखवस्तु माणसाला. घरीं उपाशीं असलेल्या भावंडांकरितां आपणांला मूठभर धान्यसुद्धां मिळवितां येत नाहीं म्हणून या कवितेंतल्या मुलीला विलक्षण

दुःख होतें, त्यांना तोंड दाखवावयाचें तिच्या जिवावर येतें, आणि म्हणून ती जीव देते, असें दाखविलें असतें तर कदाचित् या घटनेंतला कृत्रिमपणा थोडा कमी झाला असता.

● ● ●

[वृत्त : **दिंडी**]

उभों हिरवीं शेतांत पिकें होती
आस गरिबांच्या नाचतसे चित्तीं
कोप दैवाचा तोंच अहा, झाला.
पुढें जाळित दुर्भिक्ष काळ आला ॥ १ ॥

लोक अन्ना मोताद सर्व झाले
शेतकरि ते ‘अन्नान्न’ करित मेले
घांस नाहीं खाण्यास, गुरें मेलीं.
अवकळा त्या खेड्यास दिसे आली ॥ २ ॥

आठ दिवशीं बाजार भरे तेथें
धान्य देशाहुनि खरेदीस येतें;
जोंधळ्याचे घातले तिथें ढीग
माणसांची लावली एक रांघ ॥ ३ ॥

धनिक सरसावुनि कसे तिथें आले
खरेदीचें तें काम सुरू झाले;
गुरें विकुनी आपुलीं कसायाला
धान्य घ्याया हा गरिब लोक आला ॥ ४ ॥

वखारीचें त्या बघुनि तिथें दार
उभी होती राहिली एक पोर;
सान होती ती पोर अंत्यजाची
बालभावाची मधुर मूर्ति तीची ॥ ५ ॥

प्राण होते डोळ्यांत तिचे आले
आसवांनीं जाहले गाल ओले;
अशी तेथें ती पोर अंत्यजाची
उभी करुणा भाकीत त्या जनांची ॥ ६ ॥

"घरीं चिमण्या खेळती ज्या अनेक
पोर तुमची मी त्यांत असे एक
तुम्ही दादा ! आधार अनाथांला
जोंधळ्याची मज मूठ एक घाला ! ॥ ७ ॥

घरीं भावंडें चार अम्ही सानीं
बये गेली टाकोनि अम्हां रानीं,
तुम्ही दादा ! आधार अनाथांचे
चोज पुरवा पोरक्या पाडसांचें ! ॥ ८ ॥

घरीं बाळें आहेत भुकेलीं हो.
हाच त्यांच्या चित्तास एक लाहो,
'अतां अमुची येईल घरीं ताई
हंसुनि चुंबिल देईल गोड कांहीं' ॥ ९ ॥

देह माझा हा इथें उभा आहे
जीव माझा त्या जित्रलगांसि पाहे;
तुम्ही दादा ! आधार अनाथांला
जोंधळ्याची मज मूठ एक घाला !" ॥ १० ॥

अशी बोलत ती उभी करुणवाणी
लोचनांनीं गाळीत तिथें पाणी,
एक आला तों धनिक विप्र तेथें,
पाय धरुनी विनविलें तिनें त्यातें; ॥ ११ ॥

महाराचा स्पर्श तो ब्राह्मणाला
सहन नाहीं क्षणभरिहि त्यास झाला,
लाथ मारुनि चांडाळ पुढें गेला
दाखवुनि तो मृत्युचें दार तीला ! ॥ १२ ॥

—ग. त्र्यं. माडखोलकर

## माझ्या जन्मभूमीचें नांव

### परिचय

मातृभूमीच्या भक्तीचें गीत इतिहास आणि भूगोल यांतील नामावळी न वाचतांहि किती सरस होऊं शकतें याचें टिळकांची ही कविता हें एक उदाहरण आहे. ‘ माते, महात्मे तुझे, तत्त्ववेत्ते, तुझे शूर योद्धे, तुझे सत्कवि ’ या एका ओळीनें कवीनें जो परिणाम साधला आहे तो कित्येक कवितांतलीं विविध नांवांनीं भरलेलीं चार-पांच कडवीं वाचूनसुद्धां होणार नाहीं. ‘ वारा तुझ्या स्पर्शनें शुद्ध झाला ’, या कडव्यांतला प्रसाद अधिक आकर्षक आहे, कीं भावना अधिक हृदयस्पर्शी आहे हें सांगणें कठीण आहे. टिळक ख्रिश्चन झाले असले, तरी संस्कृत आणि मराठी वाङ्मयाचा त्यांचा अभिमान किती जाज्वल्य होता हें ‘ तूझ्या महोदार सारस्वताच्या ’ या श्लोकावरून दिसून येईल. हिंदभूमिचें स्थान जगांत सामान्य नाहीं, अंतीं इतर राष्ट्रांना तिलाच गुरु करावें लागेल हे कवीचे उद्गार त्याच्या मातृभूमीवरील श्रद्धेचे द्योतक आहेत. ‘ सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी ! ’ हा चरण ध्रुपदाप्रमाणें प्रत्येक श्लोकाच्या शेवटीं घालण्यांत कवीचें कौशल्य स्पष्ट दिसतें.

टिळकांच्या प्रसादगुणामुळेंच ही कविता वाचनीय झाली आहे असें नाहीं. मनुष्याच्या मातृभूमिवरील भक्तीचा आविष्कार त्यांनीं सहजसुंदर रीतीनें केला आहे, हा या कवितेंतला सर्वांत मोठा गुण होय.

‘ तूं बाळगीशी मला स्कंधिं अंकीं
सुखाची खरी हीच सीमा पुरी । ’

हा चरण किती भावमधुर आहे ! आपली आई श्रीमंत आहे का गरीब आहे, कुरूप आहे का सुरूप आहे हें जाणून घेऊन का कुणी तिच्यावर प्रेम करतो ? छे ! आईनें मायेनें पाठीवरून हात फिरविला, कीं डोक्यावरलें ओझें

हलकें होतें, तिच्या मांडीवर क्षणभर डोकें टेकलें, कीं स्वर्गसुखाचा लाभ होतो, म्हणूनच मनुष्य आईकडे ओढ घेतो कुटुंबांत जें आईचें स्थान तेंच जगांतल्या व्यवहारांत मातृभूमीचें.

• • •

सृष्टी तुला वाहुनी धन्य ! माते अशी रूपसंपन्न तूं निस्तुला
तूं कामधेनू ! खरी कल्पवल्ली ! सदा लोभला लोक सारा तुला;
या वैभवाला तुझ्या पाहुनीयां मला स्फूर्ति नृत्यार्थ होते जरी
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी ॥ १ ॥

माते ! महात्मे तुझे, तत्त्ववेत्ते, तुझे शूर योद्धे, तुझे सत्कवि,
श्रेणी ययांची सदा माझिया गे मना पूजनीं आपुल्या वांकवी !
यांचीं यशें ज्या नव्या सद्‌गुणांना मला अर्पिती, ध्येय ते गे जरी,
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी ! ॥२॥

तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी
झालों, तरी गे तृषा मन्मनाची कधींही कधींही न होणें कमी !
आई गुरुस्थान अंतीं जगाचें तुझें ! यांत शंका न काहीं जरी
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी ! ॥३॥

वारा तुझ्या स्पर्शनें शुद्ध झाला मला लाधला ! भाग्य हें केवढें !
माते ! स्वयें देशि जें अन्नपाणी, सुधा बापुडी कायशी त्यापुढे !
तूं बाळगीशी मला स्कंधिं अंकीं ! सुखाची खरी हीच सीमा पुरी !
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी ! ॥४॥

—ना. वा. टिळक

# घे कुठार

## परिचय

संस्कृत अन्योक्तींमध्यें वृक्षान्योक्ति प्रसिद्धच आहे. परोपकाराचें महत्त्व हा तिचा विषय आहे. या गीतांतल्या वृक्षाची भूमिका अन्योक्तींतल्या वृक्षापेक्षां भिन्न नाहीं; पण रचनाचातुर्यामुळें ही कविता जुन्या वृक्षान्योक्तीपेक्षां किती तरी पटींनीं भावमधुर वाटते.

गीताचा आरंभच किती सुंदर आहे !

' घे कुठार, कर उगार घाव अतां घाली ! ' मृत्यूचें आनंदानें स्वागत करणाऱ्या एखाद्या स्थितप्रज्ञासारखे वृक्षाचे हे उद्‌गार वाटतात, नाहीं ? मरण हा सुद्धां जीवनाचाच एक क्रमप्राप्त भाग आहे ही त्याची श्रद्धा पाहिली कीं आपलें दुबळें मनसुद्धां जीवनाचा नव्या दृष्टीनें विचार करूं लागतें.

जीवन हा एक यज्ञ आहे हेंच या वृक्षाचें ब्रीदवाक्य आहे. आजपर्यंत आपल्या फांद्यांवर पांखरें घरटीं बांधून सुखानें राहिलीं, उन्हानें तापलेल्या गुरांनीं आपल्या सांवलींत विसांवा घेतला, आपल्या फुलांनीं वातावरण सुगंधित केलें, आणि आपल्या फळांनीं प्रवाशांचा अंतरात्मा शांत केला, ह्या गोष्टींची स्मृति त्यालाहि आनंददायक वाटते. पण आज त्याच्या सत्त्वाची परीक्षा पाहण्याकरितांच कीं काय एक मनुष्य हातांत कुऱ्हाड घेऊन त्याच्यापुढें उभा राहिला आहे ! चांगुणे-पाशीं बालकाच्या मांसाचा हट्ट धरणाऱ्या शंकरासारखाच हा विचित्र अतिथि आहे; पण त्यालाहि तृप्त करायची वृक्षाची तयारी आहे. तो त्याला म्हणतो, ' माझ्या देहाचीं खुशाल खांडोळीं कर. त्या तुकड्यांवर शिजलेलं अन्न खाऊन तूं संतुष्ट झालास कीं, मला माझ्या मृत्यूचं मुळींच दुःख होणार नाहीं ! '

' प्रेमामृत तरुण-तरुणि ' या कडव्यांतील वृक्षाचा उपयोग खेडेगांवाच्या दृष्टीनें जितका सत्य तितकाच काव्याच्या दृष्टीनें सुंदर आहे.

● ● ●

[ **चाल :** कुठवर ही थांबणार ]

घे कुठार ! कर उगार घाव अतां घाली ॥ ध्रु० ॥

धरणीनें पोशियलें
रविकिरणीं वाढविलें
आजवरी राहियला मरुत सतत वाली

किती विहगां खांद्यावरि
वागविलें बाळांपरि
आजवरी शांत गुरें छायेमधिं झालीं

प्रेमामृत तरुणतरुणि
गेल्या ओतून इथुनि
संकेतस्थल होणें आजवरीं भालीं

काळाचा कठिण हात
वस्तूचा होत पात
आनंदें पाहत मी प्रकृतीच्या चाली

होऊं दे देह छिन्न
शकलांवर शिजवि अन्न
मन निवेल ऐकुनियां तृप्ति तुला आली !

—वा. गो मायदेव.

# महाराष्ट्र-गीत

## परिचय

कोल्हटकरांच्या कविता फारच थोड्या आहेत. कविता काय किंवा नाटकांतलीं पदें काय, सर्वत्र दृग्गोचर होणारा त्यांचा गुण कल्पकता हा होय. या गीतांतल्या पहिल्या दोन कडव्यांत तो उत्कटत्वानें प्रगट झाला आहे. विरोधाचा उपयोग करून कल्पना चमकदार करण्याचें त्यांचें कौशल्य सिद्ध करण्याला 'प्रासाद कशास' हें कडवेंसुद्धां पुरें होईल.

मात्र कल्पकतेइतका भावनेचा विलास या गीतांत आढळत नाहीं. कवितेचीं पुढचीं कडवीं अर्थदृष्ट्या ठीक आहेत पण तीं कविमनांतून सळसळत बाहेर आलीं नसून कवीनें तीं विचारपूर्वक केलीं आहेत असा वारंवार भास होतो. 'देह पडो तत्काराणिं ही असे स्पृहा।' ही गीताची शेवटची ओळ परिणामकारक असल्या- मुळें वैगुण्य जाणवत नाहीं हा भाग निराळा.

पहिल्या दोन कडव्यांतील कल्पनांइतकीच शब्दांची योजनाहि अभ्यसनीय आहे.

● ● ●

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा।
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ ध्रु० ॥

गगनभेदि गिरिविण अणु नच जिथें उणें
आकांक्षांपुढति जिथें गगन ठेंगणें
अटकेवरि जेथिल तुरंगि जल पिणें
तेथ अडे काय जलाशय-नदांविणें ?

पौरुषासि अटक गमे जेथ दुःसहा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ १ ॥

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरें
सद्भावांचींच भव्य दिव्य आगरें
रत्नां वा मौतिकांहि मूल्य मुळि नुरे
रमणीची कूस जिथें नृमणिखनि ठरे
शुद्ध तिचें शीलहि उजळवि गृहा गृहा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ २ ॥

नग्न खड्ग करिं, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेंही शौर्य मावळे
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथले
भासत शतगुणित जरी असति एकले
यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा !
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ ३ ॥

विक्रमवैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवाझेंडाहि डोलती
धर्म, राजकारण समवेत चालती
शक्तियुक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ ४ ॥

गीत मराठ्यांचें श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अतरीं ठसो
वचनिं लेखनीहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्र-धर्म-मर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ! ॥ ५ ॥

—श्री. कृ. कोल्हटकर

# सुंदर मी होणार

## परिचय

मरण जवळ आलें म्हणून आनंदित झालेला मनुष्य कुणीं पाहिला आहे का ? असा मनुष्य कुठें दिसला तर आपण त्याची वेड्यांतच गणना करूं.

आश्चर्याची गोष्ट ही कीं या कवितेंतल्या कवि गोविंदाच्या आनंदाचा उगम मृत्यूच्या दर्शनांतच आहे. मरणाला ' करुणाघन परमेश्वर ' असें संबोधण्यापर्यंत त्याची मजल गेली आहे.

बाह्यतः हें विचित्र दिसलें तरी लहानपणीं पंगु झाल्यामुळें साध्या सुखोपभोगापासून देशसेवेसारख्या उच्च उपभोगापर्यंतच्या आपल्या साऱ्या इच्छा ज्याला मारून टाकाव्या लागल्या असतील त्या जीवाला असें वाटणें स्वाभाविकच होतें. पिचत पिचत एखाद्या कोळशाची राख व्हावी तशी गोविंदाच्या आयुष्याची गत झाली. आंत तेजाचा स्फुलिंग होता; पण तो पेट कसा घेणार ? शरीरानेंच कवीचें वैर साधलें. पंगु प्रकृति आणि प्रतिकूल परिस्थिति यांच्या कात्रींत या तेजस्वी शाहीराच्या सर्व आशा—आकांक्षांच्या चिंधड्या झाल्या.

आणि म्हणूनच कवि मरणाचें उत्सुकतेनें स्वागत करीत आहे. चितेवर आपल्या पंगु देहाची राख झाली कीं आपण सुटलों, असें त्याला वाटतें. त्याची पुनर्जन्मावर श्रद्धा आहे. त्यामुळें पुढील जन्मीं मिळणाऱ्या अव्यंग देहाच्या साहाय्यानें प्रीति आणि देशभक्ति यांच्या अतृप्त भावना आपल्याला तृप्त करून घेतां येतील ही कवितेंतील मध्यवर्ती कल्पना कवीनें किती रमणीय रीतीनें रंगविली आहे.

' जुनीं इंद्रियें, जुना पिसारा, सर्व सर्व झडणार ।
नव्या तनूचे, नव्या शक्तिचे, पंख मला फुटणार ।।
त्या पंखांनीं कर्तृत्वाच्या व्योमीं मी घुसणार ।
देशहिताच्या पवनसागरीं, पोहाया सजणार ।। '

गोविंदाचें शिक्षण फारसें झालें नव्हतें हें लक्षांत घेतलें म्हणजे ‘मृत्यु म्हणजे वसंत माझा’ असल्या त्याच्या कल्पनांचें अधिकच कौतुक वाटतें.

• • •

मृत्यूपूर्वी पंधरा दिवस केलेली कविता.
[ चाल : कोठें काळा काळा राम ]

सुंदर मी होणार। आतां सुंदर मी होणार ।।
सुंदर मी होणार। हो। मरणानें जगणार ।। आतां ।। ध्रु० ।।

वर्षत्रय मम देह मरतसे। तो आतां मरणार। हो।
वर्षत्रय मम प्राण जातसे। तो आतां जाणार। हो। सुंदर ।। १ ।।

प्राशुनि माझ्या रुधिरा हंसतो, तो व्याधी रडणार। हो ।।
व्याधिक्लेशें रडतो तो मम, जीवात्मा हंसणार। हो। सुंदर ।। २ ।।

हृद्रोगाच्या ज्वाला विझुनी सुख माझें निवणार। हो।
माझा मृत्यू माझा सारा अश्रुपूर गिळणार। हो। सुंदर ।। ३ ।।

कंटक पंजर तनुपीडेचा, पिचूनिया फुटणार। हो।
बंदिवान मम आत्मा चातक सुखेनैव सुटणार। हो। सुंदर ।। ४ ।।

जुनीं इंद्रियें जुना पिसारा, सर्व सर्व झडणार। हो।
नव्या तनूचे नव्या शक्तिचे, पंख मला फुटणार। हो। सुंदर ।। ५ ।।

त्या पंखांनीं कर्तृत्वाच्या व्योमीं मी घुसणार। हो।
देशहिताच्या पवनसागरीं, पोहाया सजणार। हो। सुंदर ।। ६ ।।

प्रतिभा प्रसन्न नव बुद्धीची, चंचु मला येणार । हो ।
चंचुरूप मुरलीनें प्रभुचें, काव्यगान गाणार । हो । सुंदर ॥ ७ ॥

मम हृदयांतरिं ज्ञानफुलांचा फुलबगिचा फुलणार । हो ।
फुलांत झुलुनी आत्मदेव मम नवानंद लुटणार । हो । सुंदर ॥ ८ ॥

नवें ओज मज, नवें तेज मज, सर्व नवें मिळणार । हो ।
जीर्ण जुन्यास्तव कोण अवास्तव, सुज्ञ झुरत बसणार । हो । सुंदर ॥ ९ ॥

गहनो-गहनीं भुवनो भुवनीं, शोधित मी फिरणार । हो ।
भूमातेला हुडकुन काढुन तद्दर्शन घेणार । हो । सुंदर ॥ १० ॥

माझि भरारी विमान उडतें भरकन् तिज देणार । हो ।
परवशतेचें जाल तोडुनी, उडवुनि तिज नेणार । हो । सुंदर ॥ ११ ॥

उडत उडत मग रडत रडत मग, प्रभुपाशीं जाणार । हो ।
स्वतंत्र तिजला करा म्हणूनी तच्चरणीं पडणार । हो । सुंदर ॥ १२ ॥

व्यंग देह हा यानें कामुक, काम कसें पुरणार । हो ।
पुरलें नच तें पुढतीं पुरवुन आणणार शतवार । हो । सुंदर ॥ १३ ॥

या जन्मीं नच मोद लाभला खेद मात्र अनिवार । हो ।
प्रीति अतृप्ता तृप्ति अशांता जन्म मला देणार । हो । सुंदर ॥ १४ ॥

मृत्यू म्हणजे वसंत माझा, मजवरतीं खुलणार । हो ।
सौंदर्याचा ब्रह्मा तो मज, सौंदर्यें घडणार । हो । सुंदर ॥ १५ ॥

तळमळ हरुनी कळकळ देई मृत्यु असा दातार । हो ।
कळकळ भक्षुनि जळफळ वितरी, रोग असा अनुदार ।हो।सुंदर॥१६॥

प्रेम हांसतें, हास्य नाचतें, मृत्यूचा परिवार । हो ।
शोक क्रंदतें, भय स्फुंदतें, रोगाचा दरबार । हो । सुंदर ॥ १७ ॥

जगण्याच्या नव अवताराचा, मरणें हा व्यवहार । हो ।
जगतें जगणें प्रभुप्रमाणें, मरणें क्षण जगणार । हो । सुंदर ॥ १८ ॥

मरण्याविरहित जगणें मिळवूं असा करूं निर्धार । हो ।
शाश्वत जगण्यामधें कोठचा, दुःखाचा संचार । हो । सुंदर ॥ १९ ॥

आनंदी आनंद जाहला, तनुकांति होणार । हो ।
मरणाचा परमेश्वर मजवर, करुणाघन वळणार । हो । सुंदर ॥ २० ॥

आनंदी आनंद जाहला, मरतां मी हंसणार । हो ।
हांसत मरणें गोविंदाचा प्रेमपंथ ठरणार । हो । सुंदर ॥ २१ ॥

—कवि गोविंद

## कृतज्ञता

## परिचय

या कवितेंतलें करुण शब्दचित्र वाचून सद्गदित होणार नाहीं असा वाचक विरळाच सांपडेल. प्रसंग नित्याचा, शब्द नेहमींचेच, कुठें कल्पकतेचा चकचकाट नाहीं किंवा अलंकारांचा किणकिणाट नाहीं. भैरवीचे साधे सूर ऐकले तरी मनाला त्यांतलें कारुण्य जसें हृदयस्पर्शी वाटतें, तसें या कवितेंतलें वर्णन भावना हलवून सोडतें.

आधींच मृत्यूचा प्रसंग अत्यंत करुण. त्यांत तो मृत्यु बालकाचा! आणि तें मूलहि कसें तर आईपासून शेंकडों मैल दूर असलेलें! इस्पितळांतली सेविका प्रेमळ आहे; डॉक्टर धर्मात्मा आहे; पण त्यांच्या ममतेनें आईच्या मायेची उणीव कशी भरून येणार? वासराला चारा दिला, पाणी दिलें, त्याच्या गळयाखालीं मायेनें खाजविलें, म्हणून तें आईसाठीं हंबरायचें राहतें असें थोडेंच आहे?

मृत्यूच्या दारांतून शेवटचें मागें वळून पाहतांना या कृतज्ञ बाळजीवाच्या तोंडून उपकार फार झाले असे डॉक्टरांना उद्देशून उद्गार निघावेत हें स्वाभाविकच आहे. पण त्या उद्गारांमागोमाग त्याला आईची आठवण येते. त्यामुळें 'कृतज्ञता' हें कवीनें दिलेलें नांव सार्थ असलें तरी 'आई' हें नांवसुद्धां या कवितेला शोभलें असतें असें क्षणभर वाटल्यावांचून राहत नाहीं.

इस्पितळांत मृत्यु पावणाऱ्या एका बालकाचें कलापूर्ण शब्दचित्र काढणें ह्याच या कवितेचा मुख्य हेतु आहे यांत शंका नाहीं. पण सजीव कला ही समाजाच्या जीवनापासून दूर राहूं शकत नाहीं, याचें प्रत्यंतरहि तिच्यांत मिळतें.

या कवितेंतली अत्यंत हृदयस्पर्शी घटना मृत्यु ही नाहीं, तर शहरांत मृत्युशय्येवर पडलेल्या बालकाची आणि त्याच्या काकणांत असलेल्या आईची शेवटीं दृष्टभेटसुद्धां होत नाहीं ही आहे. आईला सोडून एवढा लहान मुलगा शहरांत कां आला,

कोंकणांत असलेली त्याची आई त्याला भेटायला कां येऊं शकली नाहीं इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें आपण शोधूं लागलों तर एकच उत्तर मिळेल—दारिद्र्य—विषम सामाजिक रचनेनें निर्माण केलेलें भयंकर दारिद्र्य !

● ● ●

[ जाति—दिंडी ]

पोर खाटेवर मृत्युच्याच दारा
कुणा गरिबाचा तळमळे बिचारा

दूर आई राहिली कोंकणांत
सेविकेचा आधार एक हात !

ताप त्यानें भरतांच तडफडावें
पांखरानें एकलें फडफडावें

हळू गोंजारी सेविका दयाळू
डाक्तराचें वच शांतवी कृपाळू

कधीं त्यानें घ्यावें न मुळीं अन्न
कुठें डोळे लावून बसे खिन्न

आणि डाक्तर येतांच गोंजराया
हाय ! लागे तो घळघळां रडाया

एक दिन तो व्याकूळ फार झाला
आणि त्यानें पुशिलेंच डाक्तराला

'अतां दादा मरणार काय मी हो?'
तोंच लागे अश्रुची धार वाहों

हृदय हलुनी डोळयांत उभें पाणी
तरी डाक्तरची वदे करुण वाणी

दोन गोष्टी सांगून धीर देई
पुन्हा गोंजारुन शान्तवून जाई

रात्र अन्धारी माजली भयाण
सोसवेना जीवास अतां ताण

हळुच बोलावी बाळ डाक्तराला
तोहि धर्मात्मा धावुनीच आला

अतां बाळाला टोंचणार तोंच
वदे वासुनि पांखरूं दीन चोंच–

'नको आतां...उपकार फार झाले !
तुम्ही...मजला किति...गोड...वागवीलें
भीत..दादा...मरणास..मुळीं...ना...हीं !
तुम्ही...आ...ई' ! बोलला पुढें नाहीं

झणीं. डोळे फिरविले बालकानें
आणि पुशिलीं लोचनें डाक्तरानें !

—गिरीश

# तानाजीच्या पत्नीचा विलाप

## परिचय

कालिदासाचा रतिविलाप सुप्रसिद्ध आहे. त्या विलापाचें वैशिष्ट्य कल्पकतापूर्ण भावदर्शन हें आहे. गोविंद कवींच्या या विलापाचा आत्मा वीरश्री हा आहे. या कवितेंतून इतकें तेज सळसळत आहे, कीं तिला विलाप म्हणणेंसुद्धां चुकीचें ठरेल.

कोंडाणा घेतां घेतां तानाजी धारातीर्थी पडल्यावर त्याची पत्नी तिथें येते अशी या कवितेची भूमिका आहे. नायिकेच्या उद्गारांतलें संस्कृत शब्दांचें प्राचुर्य व आपलें मनोगत व्यक्त करण्याकरितां मधून मधून संस्कृत कल्पनांचा आश्रय करण्याची तिची पद्धत यांच्यामुळें कवितेंतला ओजस्वीपणा थोडासा कृत्रिम वाटतो. पण हें वैगुण्य वगळलें तर वीरपत्नीचें वैशिष्ट्य दर्शविणाऱ्या या कवितेइतकीं रसरशीत गीतें मराठींत थोडींच सांपडतील.

तानाजीची पत्नी त्याच्याशीं बोलूं लागते. तिचा पहिला प्रश्न, ' मला सोडून तुम्हांला स्वर्गांत करमेल का ? ' अशा अर्थाचा नाहीं. ' एक कोंडाणा घेतलांत, पण अजून किती तरी गड घ्यायचे राहिले आहेत, मग तुम्हीं स्वर्गांत जायची इतकी घाई कां केली ? ' असें ती त्याला विचारते. आपला पति आपल्यावर रागावून निघून गेला असेल अशी प्रेमळ शंका मनांत आली तरी त्या रागाचें कारण आपण त्याच्याबरोबरीनें लढायला आलों नाहीं हेंच असावें असें तिला वाटतें.

मुलगा लहान असतांना पति मृत्युमुखीं पडला तर स्त्रीला अधिकच दुःख होतें. तानाजीची पत्नी या नियमाला अपवाद नाहीं. पण तिच्या दुःखाचें कारण आपल्या मुलाला संभाळायला कुणी नाहीं हें नसून आपल्या मुलाला देशभक्तीचे धडे द्यायला आपला पति या जगांत नाहीं हें आहे.

या कवितेंतील ' अश्रु गाळि स्वातंत्र्याचें स्फुंदुनी निशाण ' आणि ' नको रडूं

खड्गा नेइन मीहि तुला संगरा ' या दोन ओळींचें सौंदर्य कधींहि कोमेजणार नाहीं.

नरवीर तानाजी याच्या स्त्रीचा वीरोचित विलाप
( तानाजीच्या भाग्यशाली पत्नीचें तेज महाराष्ट्रांतील
स्त्रियांना पुन्हां प्राप्त होईल का ? )

● ● ●

[ **चाल** : जरी कुणा श्रीमंताची ]

प्रिया ! काय घेतां निद्रा मृत्युची भयंकरा ।
उठा अहो, धीरा, वीरा शूरसिंह–सुंदरा ।।ध्रु०।।

एक सिंहगड घेतांना श्रांत काय झाला ।
अजुन कितिक गड घेण्याचें राहिलें दयाळा ।
नाथ चरण स्वकरें चुरुनी वारुं का श्रमाला ।
दया करा ! आक्रंदे ही माउली वसुंधरा ।। १ ।।

अजुन नाहिं झाली अपुली मायभू स्वतंत्र ।
कुठें शत्रु बुडले सांगा मृत्युसागरांत ।
श्रीशिवास केल्यावांचुनि भद्रि शोभिवंत ।
उचित काय स्वर्गारोहण ? भूमिभाग्यमंदिरा ।। २ ।।

नाथ रुधिरिं तरतां श्रमला समरिं सुप्त झालां ।
जणूं संगरारण्यामधि मथुन रिपुमृगाला ।
रक्तमांस सेवित हा मृगराज झोंपि गेला ।
मुखावरी घेउनि अपुल्या लाल रुधिरअंबरा ।। ३ ।।

लढावया भूमातेस्तव समरिं मी न आलें ।
म्हणुनि काय कोपुनि प्रियकर पहुडले भुकेले ?
क्षमा करा, चुकलें, बहु मत्प्राण तृषित झाले ।
पुण्यचषक त्वत्प्रेमाचे पिण्या प्रेमनिर्झरा ।। ४ ।।

विजयलक्ष्मि तुम्हां भुलली रक्तजलें न्हाली ।
रिपुप्राणपुष्पीं नटली, लक्ष्मिवंत झाली ।
विजयारति घेउन स्वामीपदांपुढें ठेली ।
मला म्हणे, "उठवा तुमच्या प्रियकरा मनोहरा" ।। ५ ।।

सोडुनियां पाठीवरची रक्तमिश्र भाकरी ।
दोन प्रहर भरले कांता करा चला न्याहरी ।
तुम्हांवीण सेना सारी लेश अन्न ना वरी ।
उठा चला, येतिल आतां शिवप्रभू गंभिरा ।। ६ ।।

अहो, अजुन आहे अपुला रायबा लहान ।
देशभक्ति शिकविल त्याला तुम्हांवीण कोण ।

लावुनियां तरवारीशीं तयाचें लगीन ।
  कीर्तिसहित आलिंगा मग देवि मुक्तिसुंदरा ॥ ७ ॥

सुरेश्वरा, झालें तुज का प्राप्त पारतंत्र्य ।
  म्हणुनि नेशि स्वर्गीं माझा शूरवीर कांत ? ।
परी प्रभो ! होऊं दे मम राष्ट्र हें स्वतंत्र ।
  काय वदसि " आहे तेथें विपुल वीर संगरा" ॥ ८ ॥

अश्रु गाळि स्वातंत्र्याचें स्फुंदुनी निशाण ।
  नभांतूनि नाथावरतीं फुलें वर्षि कोण ।
शोक-हर्ष यांच्या ध्वनिचें पाहुनी तुफान ।
  हृदयकमळ भ्रमलें, भ्यालें, महामोहसागरा ॥ ९ ॥

देश-ईश-कार्या करुनी तुम्ही धन्य झालां ।
  रणीं झुंज स्वातंत्र्यास्तव झुंजतां निमालां ।
सुखें प्रिया जा, जा, स्वर्गीं, स्वार्थ बहू अम्हांला ।
  नको रडूं खड्गा, नेइन मीहि तुला संगरा ॥ १० ॥

—कवि गोविंद

# आमुची मायबोली

## परिचय

जन्मभूमीचीं विविध स्तोत्रें प्रत्येक देशांत असतात. पण जन्मभाषेचें गुणगान करणारीं गीतें मात्र त्या मानानें विरळा आढळतात.

जननी आणि जन्मभूमि हीं स्वर्गापेक्षां श्रेष्ठ असतात असें म्हणणाऱ्या संस्कृत कवीला मातृभाषेचें महत्त्व कळत नव्हतें असें नाहीं. पण देशाप्रमाणें भाषेचाहि पारतंत्र्यांत कोंडमारा होतो, माणसाप्रमाणें तिचीहि गळचेपी होत असते याची त्याला कल्पनाच नव्हती.

इंग्रजीच्या आक्रमणानें ही कल्पना मराठी मनाला आली. मोगऱ्यांसारख्या सात्त्विक वृत्तीच्या व बाळबोध वळणाच्या कवीनें अर्ध्या शतकापूर्वी 'त्यांना हेंच पुसा कीं, मरणोन्मुख होय आपुली माय। म्हणुनी औषध कांहीं पुत्रीं देऊं नये तिला काय?' असा जो तळमळीनें प्रश्न विचारला होता, त्याचें कारण तत्कालीन सुशिक्षित वर्गाची मातृभाषेविषयींची उदासीनता हेंच होतें.

ती उदसीनता आज राहिली नसली तरी मराठीच्या अभिमानाची जागृत बुद्धीनें जोपासना करण्याची जरूरी कमी झाली आहे असें मात्र नाहीं. अग्नीप्रमाणें अभिमानहि चेतवावा लागतो हें ध्यानांत घेऊन माधव जूलियनांनीं ही कविता रचली आहे. आणि त्यांच्या सुंदर भावगीतांइतकीच ती लोकप्रिय झाली आहे.

कुठल्याहि अतिशयोक्तीच्या आहारीं न जातां कवीनें मराठी भाषेविषयींचा आपला अभिमान या कवितेंत मोठ्या ओजस्वीपणानें व्यक्त केला आहे. 'मराठी भिकारीण झाली तरीही कुशीचा तिच्या तीस केवी त्यजी?' या प्रश्नाची मोगऱ्यांच्या वर उद्धृत केलेल्या प्रश्नाशीं तुलना केली कीं या कवितेंतला रसरशीतपणा चटकन् ध्यानांत येतो. मराठीला 'ज्ञानदेवी' म्हणण्यांत कवीनें मनोहर मार्मिकता प्रगट केली आहे. स्थल आणि धर्म यांत कितीहि अंतर असलें तरी एक भाषा बोलणाऱ्या माणसांत बंधुभाव असलाच

# सहगमन

## परिचय

मानवी व्यवहारांतलें बुद्धीचें महत्त्व मान्य करूनहि असें म्हणतां येईल कीं, भावनेवांचून जीवनाला पूर्णता येत नाहीं. खुनाच्या खटल्यांतल्या आरोपीचा बचाव करण्याकरितां एखाद्या बुद्धिवान् वकिलानें तास नि तास केलेलें अस्खलित भाषण ऐकून कोण मंत्रमुग्ध होत नाहीं ? पण या वक्तृत्वपूर्ण भाषणापेक्षांहि पोटच्या गोळ्याकरितां उपाशी राहणाऱ्या मातेचें मौन अधिक परिणामकारक होतें.

त्याग हा जीवनमंदिराचा कळस आहे. देशासाठीं धारातीर्थी पडणाऱ्या वीरपुरुषांच्या चरित्रांइतकेंच घरांच्या चार भिंतींत रक्ताचें पाणी करणाऱ्या अबलांच्या आयुष्यांतहि त्याचें दर्शन होतें. मात्र त्यागाची ही दिव्य शक्ति श्रद्धेवांचून लाभत नाहीं. बाबू गेनूसारख्या मजुरानें देशासाठीं हंसतमुखानें बलिदान केलें. पण बाबूपेक्षां अनेक पटींनीं बुद्धिवान् आणि संपन्न असलेल्या लाखों लोकांना, त्याच्या धैर्याचा हेवा वाटला, तरी देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामांत उडी घेण्याचा धीर झाला नाहीं. बुद्धीचें पांगळेपण अशा कसोटीच्या प्रसंगींच प्रकट होतें.

' सहगमन ' या कवितेंत हेंच तत्त्व कवीनें चित्रित केलें आहे. बुद्धि ही राजाची राणी आणि भावना ही साध्या सैनिकाची रमणी खरी ! पण ही साधी-भोळी वल्लभा आपल्या मृत पतीच्या चितेवर हंसत हंसत चढते; जणू कांहीं ती चिता नसून सुंदर रीतीनें शृंगारलेली शय्याच आहे ! त्या सैनिकाप्रमाणें राजाहि रणांगणांत पडला आहे. पण राणीला सहगमनाचा धीर होत नाहीं. ती तडफडते, स्वतःवर चडफडते, आपल्या दुबळेपणाची तिला लाज वाटते. पण कांहीं केल्या तिचें पाऊल राजाच्या चितेकडे पडत नाहीं. उग्र त्यागाच्या तेजाला भिऊन ती डोळे मिटून घेते.

मात्र सैनिकाच्या रमणीचें मरण आपल्या जीवनाहून उज्ज्वल आहे हें तिला पूर्णपणें कळतें. ती विनवितें—

> ' पोटीं घालुनि हें दुबळेपण
> मला आपुली तूं राया म्हण
> स्वर्गीं जाउं नको मज विसरुन ! '

अश्रद्ध दुबळ्या बुद्धिवंतांच्या मनाचा आयुष्यांत होणारा कोंडमारा ही या कवितेची मध्यवर्ती कल्पना आहे.

● ● ●

हुरहुरे स्मरुनि मन तव चरणां
थरथरे बघुनि तनु परि मरणा ॥ ध्रु० ॥

साधी भोळी सैनिकरमणी
चढे चितेवर हांसत नयनीं
दूर उभी मी, असुनी राणी
कथुं तळमळ आंतिल कशी कुणा ?

मंचकावरी जणु निद्रित वर
जवळीं जाई बाला आतुर
विनवित अबला ' द्वैत दूर कर ! '
लाधेल धीर हा कधीं मना ?

तुझ्यासवें मन माझें रमणा
देहाचा परि बंध तुटेना
राघू गगनीं, पंजरिं मैना
मग संगम दुर्लभ दयाघना !

चिता भडकल्या किति भंवतालीं
धडधडत्या ज्वालांच्या तालीं
स्वर्ग गातसे, मी पाताळीं
शोधितें अंधतमिं मम किरणा !

ज्वाला नच या विजयपताका
पतिव्रताबल दाविति लोकां
फडफडुनी जरि मारिति हांका
पद पुढें पडेना भिउनि रणा !

पोटीं घालुनि हें दुबळेपण
मला आपुली तूं राया म्हण
स्वर्गीं जाउं नको मज विसरुन
बघ पदर पसरिला, करि करुणा.

—वि. स. खांडेकर

# प्रेम आणि मरण

## परिचय

गोविंदाग्रज प्रेमाचे शाहीर म्हणून सुप्रसिद्ध आहेत. या शाहीरानें आपल्या अलौकिक कल्पकतेनें ओसाड आडांत एकलेपणाच्या आगीनें जळून जाणाऱ्या फुलांपासून विजेच्या स्पर्शानें भस्म होत असतांना हंसणाऱ्या वृक्षापर्यंतच्या अनेक अद्भुतरम्य प्रेमकहाण्या सुंदर रीतीनें वर्णन केल्या आहेत.

कवितेच्या आरंभीं होनाजी बाळाच्या दोन ओळी कवीनें मुद्दाम उद्धृत केल्या आहेत. दीपज्योतीवर झडप घालून जळून जाणाऱ्या पतंगाची भावनाशून्य लोक खुशाल वेड्यांत गणना करोत. होनाजी बाळाला पतंगाच्या या त्यागांतच उत्कट प्रीतीचा साक्षात्कार होतो.

गडकऱ्यांनीं या दिव्य त्यागाकरितां निराळीच जोडी निर्माण केली. दीपज्योतीची वीज झाली. अर्थात् पतंगाचें रूपांतर वृक्षांत होणें क्रमप्राप्तच होतें. या वृक्षाचें स्पर्शसुख मिळावें म्हणून त्याच्या भोंवतालच्या किती तरी वेली तळमळत होत्या. पण प्रेमाला आपले आराध्य दैवत दिसलें, कीं तें आंधळें होतें. वृक्षानें मेघनादाच्या तालावर नर्तकीप्रमाणें नाचणारी वीज पाहिली होती. तिची मानसपूजा करण्यापलीकडे त्याला दुसरें कांहीं दिसेना, सुचेना, रुचेना.

प्रीतीपेक्षां अधिक मोठें वेड जगांत दुसरें कोणतेंच नाहीं. विजेचें वेड लागलेल्या त्या वृक्षाच्या कळया पूर्ववत् फुलेनात, त्याचीं पानें वायुलहरींच्या हातांत हात गुंफून नाचेनात. साऱ्या वनस्पतिसृष्टीला वाटलें, " या वेड्यानें आपल्या आयुष्याचा सत्यनाश करून घेतला ! प्रीतीसाठीं कुणी शहाणा मनुष्य असा झुरत बसतो का ? "

त्याची ही तपश्चर्या पाहून इंद्र घाबरला, ध्रुवाला आपलें अढळपद जाईल असे भय वाटूं लागलें. शेवटीं तपोदेवता प्रसन्न होऊन ' स्वर्गातला कल्पवृक्ष

हो; तें नको असेल तर प्रलयकालांत बालहरि ज्याच्या पत्रावर शयन करतो तो वटवृक्ष हो ' असा वर त्याला देऊं लागली. पण माणिकमोत्यांच्या राशी पुढें केल्या म्हणून तहानेलेल्या माणसाचें समाधान होईल का ? प्रीतीची तृषाहि अशीच असते !

'विजेचा स्पर्श होतांच तूं जळून जाशील'—असा तेहतीस कोटि देवांनीं त्याला उपदेश केला. पण प्रीतीला मृत्यु भिववूं शकत नाहीं. त्या प्रेमवेड्या वृक्षानें उत्तर दिलें,—

'क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव घडो मरणांचा । मग पुढें ॥'

शेवटीं त्याची तपस्या सफल झाली. प्रीतीची जळती ज्योत त्याला कडकडून भेटली तिच्या स्पर्शासरशीं वृक्ष उन्मळून, दुभंगून खालीं पडला. पण त्याचा हा मृत्यु किती आनंदपूर्ण होता !

'दुभंगून खालीं पडला
परि पडतां पडतां हंसला । एकदां ॥

हर्षाच्या येउनि लहरी
फडफडुनी पानें सारीं । हांसलीं ॥

त्या कळया सर्वही फुलल्या
खुलल्या त्या कायम खुलल्या ॥"

कायम सारख्या कर्णकटु शब्दाकडे आपलें प्रथम लक्षहि जात नाहीं, इतकें हें वर्णन सरस आहे.

गडकऱ्यांनीं या कवितेंत वर्णिलेली प्रीति भक्तीहून भिन्न नाहीं. अद्‌भुतरम्य मध्यवर्ती कल्पना, तिचा कल्पकतापूर्ण विस्तार, पौराणिक पार्श्वभूमीनें उत्पन्न केलेली भव्यता, दोन दोन सुंदर ओळींत व्यक्त झालेले प्रेमिकांचे कारुण्यपूर्ण उत्कट अनुभव, इत्यादि गुणविशेषांमुळें ही कविता नेहमींच लोकप्रिय राहील.

● ● ●

" जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ।
झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी "–**होनाजी बाळ**

कुठल्याशा जागीं देख ।
मैदान मोकळें एक । पसरलें ।।

वृक्ष थोर एकच त्यांत ।
वाढला पुऱ्या जोमांत । सारखा ।।

चहुंकडेच त्याच्या भंवतें ।
गुडघाभर सारें जग तें । तेथलें ।।

झुडपेंच खुरट इवलालीं ।
मातींत पसरल्या वेली । माजती ।।

रोज तीं । कैक उपजतीं । आणखी मरतीं ।
नाहिं त्या गणती । दाद ही अशांची नव्हती । त्याप्रती ।।

त्यासाठीं मैदानांत ।
किति वेली तळमळतात । सारख्या ।।

परि कर्माचें विदान ।
कांहीं तरि असतें आन । चहुंकडे ।।

कोणत्या मुहूर्तावरती ।
मेघांत वीज लखलखती । नाचली ।।

त्या क्षणीं । त्याचिया मनीं । तरंगति झणीं ।
गोड तरि जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी । न कळतां ।।

तो ठसा मनावर ठसला ।
तो घाव ज़िव्हारीं बसला । प्रीतिचा ।।

वेड पुरें लावी त्याला ।
गगनांतिल चंचल बाला । त्यावरी ।।

जाति धर्म त्याचा सुटला ।
संबंध जगाशीं तुटला । त्यापुढें ।।

आशाहि । कोठली कांहिं । राहिली नाहिं ।
सारखी जाळी । ध्यास त्यास तीन्ही काळीं । एक तो ।।

मुसळधार पाउस पडला ।
परि कधीं टवटवी त्याला । येइना ।।

जरि वारा करि थैमान ।
तरि हले न याचें पान । एकही ।।

कैकदां कळयाही आल्या ।
नच फुलल्या कांहीं केल्या । परि कधीं ।।

तो योग । खरा हटयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लागतें जगावें त्याला । हें असें ।।

ही त्याची स्थिति पाहुनियां ।
ती दीड वितीची दुनिया । बडबडे ।।

कुणि हंसे कुणी करि कींव ।
तडफडे कुणाचा जीव । त्यास्तव ।।

कुणि दयाहि त्यावरि करिती ।
स्वर्गस्थ देव मनिं हंसती । त्याप्रती ।।

निंदिती । कुणी त्याप्रती । नजर चुकविती ।
भीतिही कोणी । जड जगास अवजड गोणी । होइ तो ॥

इष्काचा जहरी प्याला ।
नशिबाला ज्याच्या आला । हा असा ॥

टोंकाविण चालू मरणें ।
तें त्याचें होतें जगणें । सारखें ॥

हृदयाला फसवुनि हंसणें ।
जीवाला न कळत जगणें । वरिवरी ॥

पटतना । जगीं जगपणा । त्याचिया मना ।
भाव ज्या टाकी । देवांतुनि दगडचि बाकी । राहतो ॥

यापरी तपश्चर्या ती ।
किति झाली न तिला गणती । राहिली ॥

इंद्राच्या इद्रपदाला ।
थरकांप सारखा सुटला । भीतिनें ॥

आश्चर्यें ऋषिगण दाटे ।
घ्रुव बाळा मत्सर वाटे । पाहुनी ॥

तों स्वतां । तपोदेवता । काल संपतां ।
प्रकटली अंतीं । "वरं ब्रूहि" झाली वदती । त्याप्रती ॥

"तप फळास आलें पाही ।
माग जें मनोगत कांहीं । यावरी ॥

हो चिरंजीव लवलाहीं ।
कल्पवृक्ष दुसरा होई । नंदनीं ॥ "

प्रळयींच्या वटवृक्षाचें ।
तुज मिळेल पद भाग्याचें । तरुवरा ॥

तो वदे । " देवि, सर्वदे, । हेंच एक दे ।
भेटवी मजला । जीविच्या जिवाची बाला । एकदां ॥ "

सांगती हिताच्या गोष्टी ।
देवांच्या तेतिस कोटी । मग तया ॥

" ही भलती आशा बा रे ।
सोडि तूं वेड हें सारें । घातकी ॥

स्पर्शासह मरणहि आणी ।
ती तुझ्या जिवाची राणी । त्या क्षणीं ॥

ही अशी । शुद्ध राक्षसी । काय मागसी ॥
माग तूं कांहीं । लाभलें कुणाला नाहीं । जें कधीं ॥ "

तो हंसे जरा उपहासें ।
मग सर्वेंच वदला त्रासें । त्यांप्रती ॥

" निष्प्रेम चिरंजीवन तें ।
जगिं दगडालाही मिळतें । धिक् तया ॥

क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव घडो मरणांचा । मग पुढें ॥ "

निग्रहें । वदुनि शब्द हे । अधिक आग्रहें ।
जीव आवरुनी । ध्यानस्थ बैसला फिरुनी ।। वृक्ष तो ।।

तो निग्रह पाहुनि त्याचा ।
निरुपाय सर्व देवांचा । जाहला ।।

मग त्याला भेटायाला ।
गगनांतिल चंचल बाला । धाडिली ।।

धांवली उताविळ होत ।
प्रीतीची जळती ज्योत । त्याकडे ।।

कडकडे । त्यावरी पडे । स्पर्श जों घडे ।
वृक्ष उन्मळला । दुभंगून खालीं पडला । त्या क्षणीं ।।

दुभंगून खालीं पडला ।
परि पडतां पडतां हंसला ।। एकदां ।।

हर्षाच्या येउनि लहरी ।
फडफडूनी पानें सारीं । हांसलीं ।।

त्या कळया सर्वही फुलल्या ।
खुलल्या त्या कायम खुलल्या ।। अजुनिही ।।

तो योग । खरा हटयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लाभतें मरणही त्याला ।। हें असें ।।

—गोविंदाग्रज

# रुद्रास आवाहन

## परिचय

‘तुझ्या गळां माझ्या गळां, गुंफूं मोत्याच्या माळा’ हें अल्लड भावाबहिणींचें लटकें भांडण, ‘डोळे हे जुलुमि गडे, रोखुनि मज पाहुं नका’ ही नववधूची मुग्ध शृंगाराची आविष्कार करणारी विनवणी, ‘कुणि कोडें माझें उकलिल का?’ हा रसिक प्रेमिकाचा मधुर प्रश्न, ‘रुणुझुणु ये रुणुझुणु ये झणकारित वाळा’ हे बालकाचें स्वागत करणारे मधुमधुर बोल, इत्यादिकांच्या वाचकाला तांबे हे संसारी कवि आहेत, कौटुंबिक भावनांत रंगून जाणें हाच त्यांच्या प्रतिभेचा विशेष आहे, असें वाटलें तर त्यांत नवल नाहीं. पण तांब्यांची प्रतिभा अष्टपैलू आहे. त्यांनीं सामाजिक, ऐतिहासिक, राष्ट्रीय अगर देशभक्तिपर कविता अट्टाहासानें कधींच लिहिल्या नाहींत. पण हिंदु विधवेच्या मनाचें सूक्ष्म चित्रण करणाऱ्या त्यांच्या कविता संख्येनें थोड्या असल्या तरी त्या वाचून गहिंवर येतो. ‘झांशीवाली’ ही त्यांची एकुलती एक ऐतिहासिक कविता आहे. पण तिचा आदि नि अंत किती सुंदर आहे!

‘रे हिंदबांधवा, थांब या स्थळीं
अश्रु दोन ढाळीं,
ती पराक्रमाची ज्योत मावळे इथें झांशिवाली.’

असा या स्मृतिगीताचा प्रारंभ करून शेवटीं ते म्हणतात—

‘ह्या दगडां फुटतिल जिभा कथाया कथा
सकळ काळीं!’

तांबे हे स्वभावतः कौटुंबिक कवि असले तरी ते तत्त्वज्ञ कवि आहेत. १९२१ च्या ऑगस्टमध्यें मृत्यूची छाया स्वतःवर पडली असतांना त्यांनीं तीन आठवड्यांत ज्या आठ कविता लिहिल्या आहेत त्या त्यांच्या प्रतिभेंत काव्याचा कोमलपणा आणि तत्त्वज्ञानाचा कठोरपणा यांचा किती सुंदर संगम झाला आहे हें दर्शवितात.

मनुष्य मरणाकडे भीतीनें पाहतो. मरण हा त्याला आपल्या आशा–आकांक्षांचा, जीवनाचा, चैतन्यमय स्फुरणाचा शेवट वाटतो. पण मरण हा जीवन-विकासाचा क्रमप्राप्त भाग आहे, अशी तांब्यांची श्रद्धा आहे. ‘घन तमीं शुक्र बघ राज्य करी’ या आशावादानें रसरसलेल्या कवितेंत ते म्हणतात—

‘फूल गळे, फळ गोड जाहलें
बीज नुरे, डौलांत तरु डुले
तेल जळे, बघ ज्योत पाजळे,
कां मरणिं अमरता ही न खरी ?’

आत्मदान, त्याग, यज्ञ—कुठलेंहि नांव दिलें तरी मानवी जीवनाचा आत्मा या स्वार्थनिरपेक्ष भावनेंत आहे. भयंकर अरण्यांत राहणारा मनुष्य आज सुंदर नगरांत राहतो. गारगोटीनें विस्तव करणारा मनुष्य आज विद्युद्दीपाच्या प्रकाशांत वावरतो. रोग झाला कीं आकाशाकडे दीनवाण्या मुद्रेनें पाहणारा मनुष्य आज शरिराच्या आंतला रोग कुशलतेनें कापतो. जगाच्या आरंभापासून प्रत्येक पिढींतल्या बुद्धिमंतांनीं जीवन हा यज्ञ आहे अशी श्रद्धा ठेवून काम केलें नसतें तर आज डोळ्यांना मानवजातीची प्रगति नुसत्या कल्पनेंतसुद्धां दिसली नसती.

रसग्राहक दृष्टीनें मानवजातीच्या इतिहासाकडे पाहिलें म्हणजे अशा तऱ्हेचे विचार मनांत येतात. पण इतिहासावरून वर्तमानाकडे दृष्टि वळविली तर मानवी प्रगतीला खग्रास ग्रहण लागत आहे कीं काय अशी शंका मनांत आल्यावांचून राहत नाहीं. एकेका पिढीला जगांत दोन दोन महायुद्धें होत असून त्यांत माणसें मुंग्यांसारखीं चिरडलीं जात आहेत. एकीकडे श्रीमंत कुबेराशीं सर्व बाबतींत स्पर्धा करीत आहेत; तर दुसरीकडे या संपत्तीचें उत्पादन करणारे खातेऱ्यांत खितपत दिवस कंठीत आहेत. आज जगाचें राज्य प्रेम, सत्य अथवा भावना यांच्याकडे नाहीं. त्याचीं सारीं सूत्रें जुलूम, सत्ता आणि कायदा यांच्या हातांत गेलीं आहेत. समाजरचना बदलल्याशिवाय आणि जीवनाचीं नवीं मूल्यें प्रस्थापित झाल्याशिवाय ही परिस्थिति बदलणार नाहीं. क्रान्तिच हें कार्य करूं शकेल अशी तांब्यांची श्रद्धा आहे. ‘रुद्रास आवाहन’ या क्रान्तीला आवाहन करणाऱ्या ओजस्वी गीतांत त्यांचे सर्व काव्यगुण

प्रकर्षानें प्रगट झालेले दिसतात. या कवितेचा प्रारंभच किती गंभीर व नादपूर्ण आहे पाहा—'डुमडुमत डमरु ये, खणखणत शूल ये, शंख फुंकीत ये, येइ रुद्रा!' रसपरिपोषक शब्दरचना, विशाल कल्पना, भारतीय संस्कृतींतून निर्माण झालेलें रूपक, विषमतेच्या पायावर उभारलेली आजची निर्घृण समाजरचना नाहींशी झाल्याशिवाय जग सुखी होणार नाहीं अशी उत्कट श्रद्धा आणि 'मुकुट रंकासि दे, करटि भूपाप्रती' अशा परिणामकारक पंक्ती या सर्वांच्या संगमामुळें ही कविता मराठी वाङ्मयांत अमर होईल.

● ● ●

[ जाति–वीरभद्र. राग–शङ्करा ]

डुमडुमत डमरु ये, खणखणत शूल ये,
शङ्ख फुङ्कीत ये, येइ रुद्रा !
प्रलयघनभैरवा, करित कर्कश रवा
क्रूर विक्राळ घे क्रुद्ध मुद्रा !

कडकडा फोड नभ, उडव उडुमक्षिका,
खडबडवि दिग्गजां, तुडव रविमालिका,
माण्ड वादळ, उधळ गिरि जशी मृत्तिका
खवळवीं चहुंकडे या समुद्रां !

पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथीं,
ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालतीं,

मुकुट रंकासि दे, करटि भूपाप्रती—
झाड खट्‌खट तुझें खड्‌ग क्षुद्रां !

जल तडागीं सडे, बुडबुडे, तडतडे—
'शान्ति ही !' बापुडे बडबडति जन–किडे !
धडाधडा फोड तट ! रुद्र, ये, चहुंकडे,
धगधगित अग्निमधि उजळ भद्रा !

पूर्वि नरसिंह तूं प्रगटुनी फाडिले
दुष्ट जयिं अन्य गृहिं दरवडे पाडिले,
बनुनि नृप, तापुनी चण्ड, जन नाडिले—
दे जयाचें तयां वीरभद्रा !

—भा. रा. तांबे

# या आम्हांला सुळीं

## परिचय

यशवंतांची कविता जितकी विपुल तितकीच विविध आहे. रविकिरणमंडळाचे एक प्रमुख कवि म्हणून पंचवीस वर्षांपूर्वी ते जनतेपुढें आले. तेव्हांपासून काव्यप्रेमी रसिकांना त्यांच्याविषयीं जें गाढ आकर्षण वाटत आलें आहे तें अजूनहि ओसरलें नाहीं. एक पिढी मागें पडली. भोंवतालचें जीवन बदललें, नवे नवे काव्याचे विषय निर्माण झाले आणि वाङ्मयाच्या क्षितिजावर तरुण पिढींतले प्रतिभासंपन्न कवि चमकूं लागले, तरी यशवंत अजूनहि आपल्या उच्च स्थानीं उभे असून हृदयंगम गीतें गात आहेत. कारुण्य व ओज हे पहिल्यापासूनच त्यांच्या प्रतिभेचे आवडते रस आहेत. पण गेल्या पांचसहा वर्षांत भारतीय जीवनाच्या सर्व क्षेत्रांत क्रान्तीचे जे वादळी वारे वाहूं लागले आहेत, त्यांचा परिणाम इतर वाङ्मयाप्रमाणें यशवंतांच्या कवितेवरहि होत आहे. गेल्या पांच वर्षांतल्या करुण व प्रक्षोभक घटनांनीं त्यांची प्रतिभा अनेक वेळां प्रफुल्लित केली आहे. ' या आम्हांला सुळीं ' हें कवन त्यांच्या अगदीं अलीकडच्या काव्य-संग्रहांतलें असून ज्याच्या अंतः-करणांत देशभक्तीची ज्योत पेटली आहे असा मनुष्य फांशीं जातांनासुद्धां आपल्या कार्याविषयीं किती सश्रद्ध आणि मृत्यूविषयीं किती बेफिकीर असतो याचें त्यांनीं त्यांत कल्पकतापूर्ण चित्रण केलें आहे. ही कविता वाचतांना विनायकांच्या

> ' देशभक्ता प्रासाद बंदिशाला
> शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाला
> चिता सिंहासन शूल राजदंड
> मृत्युदैवत दे अमरता उदंड '

या ओळींची कुणालाहि आठवण होईल.

● ● ●

सतीचें वाण घेतलेल्या देशभक्तांची फांशीं जातां वेळचीं मनःस्थिति

[ **जाति**—समुदितमदना; भूपाळीसारखी ]

द्या आम्हांला सुळीं, जाहलों आम्ही तुमचे बळी
जगीं चिरन्तन नान्दतील परि अमुच्या शाण्णव कुळी
खुडून टाका अम्हांस—आम्ही दुर्वाङ्कुर भूतळीं
पाताळापर्यन्त आमुची परन्तु रुजली मुळी
काय हटवुनी हटती सागर?—हटेल एकीकडे
उफाळेल तो दुसरीकडुनी गिळून डोङगर कडे
ज्वालामुखिला बघतां लिम्पूं ? काय कल्पना खुळी !
तोच अनावर उद्यांस होइल जागृत शाण्णव कुळीं.
भाऊराया ! देवकिचीं हीं वधा सात अर्भकें
किती तोकडे उपाय ? त्यांनीं होणारें कां चुके ?
बान्धुनियां अन्धार-कोठड्या, वधस्तम्भ रोवुनी ?
बलोद्धतांनो ? धराल का अवतार-कार्य रोधुनी ?
शिळेवरी आपटा आमुचीं अहो शिरें कोवळीं
सुटून तुमच्या मुठींतुनी परि शक्ति जगीं मोकळी
द्या आम्हांला सुळीं ! जाहलों आम्ही तुमचे बळी.
अमर तत्त्व—अवतार तयाचा वाढतसे गोकुळीं

द्या आम्हांला सुळीं आणि व्हा कलेवरांचे धनी
फोडुनि पण त्या ज्योतितत्त्व का ज़ाई जगतांतुनी ?

द्या आम्हांला सुळीं आणखी मूठ–मूठ घ्या धुळी
रुण्डमालिका अमुची त्या तर ज्योतीवर काजळी.

मरणीं अमुच्या अनेक फुलतिल लोकीं दीपावली
जेत्यांनो व्हा पराभूत हो देउनि आम्हां सुळीं

खुशाल ह्या फांसांत गुन्तवा एकेकाचा गळा
पुरा साजरा करा आमुच्या विजयाचा सोहळा

आजवरी जुळविली यथामति जी जीवित–पुस्तिका
फांशीविण तिज नसे समुचिता भरतवाक्य–गीतिका

द्या आम्हांला सुळीं; होउं द्या कृतार्थ जन्मुनि कुळीं
पितर मुक्तिच्या मोदें म्हणतिल, धन्य पुत्र हे बळी.

भावि पिढ्यांना मिरवायास्तव अपुल्या वक्षःस्थळीं
तजेल अक्षय चिन्ह द्यावया द्या आम्हांला सुळीं.

—यशवन्त

## फत्तर आणि फुलें

## परिचय

‘ झेंडूचीं फुलें ’, ‘ साष्टांग नमस्कार ’ व ‘ लग्नाची बेडी ’ यांच्यासारखीं नाटकें, ‘ ब्रह्मचारी ’ व ‘ अर्धांगी ’ या थाटाचे बोलपट आणि हंशाटाळ्यांचा हुकमी पाऊस पाडणारें वक्तृत्व, या सर्वांमुळें अत्रे म्हणजे विनोदाचा धबधबा असें समीकरण महाराष्ट्रांत रूढ झालें असलें तर त्यांत नवल कसलें ? धबधब्याच्या या प्रचंड आवाजांत त्यांच्या ‘ गीतगंगे ’तल्या तरंगांचा मंदमधुर ध्वनि कुठल्या कुठें लोप पावला आहे ! पण अत्र्यांची प्रतिभा लहरी आणि स्वच्छंदी असली तरी ती केवळ विनोदी नाहीं. ते गडकऱ्यांना गुरु मानतात. आणि गडकऱ्यांपासून त्यांना फक्त विनोदाचाच वारसा मिळाला आहे असें कोण म्हणेल ? गडकऱ्यांची काव्यात्म वृत्तीहि अत्र्यांच्यापाशीं आहे. ‘ फत्तर आणि फुलें ’ वाचून केशवसुत आणि गोविंदाग्रज यांच्या कांहीं कवितांची अंधुक आठवण होते याचें कारण हेंच आहे. जगांत अंतःसौंदर्य सहजासहजीं दृष्टीला पडत नसलें तरी बाह्य सौंदर्यापेक्षां तें श्रेष्ठ असतें हें या कवितेंत कवीनें मोठ्या मार्मिकतेनें सूचित केलें आहे.

● ● ●

होता डोंगरपायथ्यास पडला धोंडा भला थोरला;
वर्षें कैकहि लोटलीं तरि न तो हाले मुळीं आपुला !
आनंदी फुलवेल एक जवळी होती सुखें राहत;
बाळें सांजसकाळ हांसत तिचीं तैशींच कोमेजत !

थट्टेखोर फुलें हंसूनि वदलीं धोंड्यास तीं एकदां,
“ धोंडा केवळ तूं ! अरे, न जगतीं कांहीं तुझा फायदा ! ”

संतापून तयास फत्तर म्हणे, "कां हीं वृथा बोलणीं
सारी सुंदरता इथेंच तुमची जाईल रे वाळुनी !"

धोंड्याच्या परि काळजास भिडले ते शब्द जाऊनियां;
काळाठिक्कर यामुळें हळुहळू तो लागला व्हावया,
पुष्पांच्या कवळ्या मनांतहि सले तें फत्तराचें वच;
गेली तोंडकळा सुकून, पडलीं तीं पांढरीं फारच !

कोणी त्या स्थळिं शिल्पकार मग तों ये हिंडतां हिंडतां,
त्याच्या स्फूर्तिस फत्तरांत दिसली कांहींतरी दिव्यता;
त्याची दिव्यकलाकरांगुलि न जों त्या फत्तरा लागली,
श्रीसौंदर्यमनोरमा प्रगटुनी साक्षात् उभी राहिली !

वेडा पीर असाच गुंगुत कुणी एकाकि ये त्या स्थळा,
ती मूर्ती बघतांच तो तर खुळा नाचावया लागला !
त्यानें तीं खुडुनी फुलें भरभरा पायीं तिच्या वाहिलीं,
तों, त्यांची फुलुनी कळी खदखदां सारीं हसूं लागलीं !

● ● ●

लावण्याकृति ती वनांत अजुनी आहे उभी हांसत,
पुष्पेंही बसलींत तीं बिलगुनी पायीं तिच्या खेळत !

—केशवकुमार

# क्रांतीचा जयजयकार

## परिचय

गेल्या दहा वर्षांत उदयाला आलेल्या कवींत कुसुमाग्रज व बोरकर, हे अग्रेसर ठरतील. प्रत्येकांत वैशिष्ट्यपूर्ण काव्यगुण विपुलतेनें आढळतात. पण प्रतिभेचा प्रकृतिधर्म भिन्न असल्यामुळें त्यांच्या कवितांच्या तोंडवळ्यांत मात्र फार थोडें साम्य आहे. बोरकरांच्या आत्मनिष्ठेमुळें त्यांचीं विविध प्रेमगीतें रमणीय झालीं आहेत. कुसुमाग्रजांच्या समाजनिष्ठेमुळें त्यांच्या राष्ट्रीय, सामाजिक आणि मानव-धर्माचा पुरस्कार करणाऱ्या कवनांना विलक्षण तेज चढलें आहे. 'क्रांतीचा जयजयकार' ही कुसुमाग्रजांची एक अशीच अत्यंत लोकप्रिय कविता आहे. केशवसुत आणि सावरकर या दोघांनाहि जिच्या निर्मितीबद्दल अभिमान वाटला असता अशा या कवितेंत ओज, कल्पकता आणि भावनाविष्कार यांची जणुं कांहीं शर्यत लागली आहे असा रसिकमनाला भास झाल्यावांचून राहत नाहीं.

● ● ●

[ अन्नत्याग करून मृत्यूच्या दारांत पाऊल टाकतांना राजबंद्यांच्या ओठावर असलेंच गाणें स्फुरलें नसेल काय ? ]

[ **जाति :** मिश्र चंद्रकांत ]

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार !
खळखळुं द्या या अदय शृंखला हातापायांत
पोलादाची काय तमा मरणाच्या दारांत ?
सर्पांनो उद्दाम, आवळा कसूनिया पाश
पिचेल मनगट परी उरांतिल अभंग आवेश

तडिताघातें कोसळेल का तारांचा संभार
कधींही तारांचा संभार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

क्रुद्ध भूक पोटांत घालुं द्या खुशाल थैमान
कुरतडुं द्या आंतडीं करूं द्या रक्ताचें पान
संहारक काली, तुज देती बळीच आव्हान
बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान
मृत्युंजय आम्ही ! आम्हांला कसलें कारागार ?
अहो, हें कसलें कारागार ?
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

पदोपदीं पसरून निखारे आपल्याच हातीं
होउनिया बेहोष धांवलों ध्येयपथावरतीं
कधिं न थांबलों विश्रांतीस्तव, पाहिलें न मागें
बांधुं न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार
होता पायतळीं अंगार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

श्वासांनो, जा वायूसंगे ओलांडुन भिंत
अन् आईला कळवा अमुच्या हृदयांतिल खंत
सांगा वेडीं तुझीं मुलें हीं या अंधारांत
बद्ध करांनीं अखेरचा तुज करती प्रणिपात
तुझ्या मुक्तिचें एकच होतें वेड परी अनिवार
तयांना वेड परी अनिवार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

नाचवितां ध्वज तुझा गुंतले शृंखलेंत हात
तुझ्या यशाचे पवाड गातां गळ्यांत ये तात
चरणांचें तव पूजन केलें म्हणुनि गुन्हेगार
देतां जीवन–अर्घ्य तुला ठरलों वेडेपीर
देशिल ना पण तुझ्या कुशीचा वेड्यांना आधार
आई, वेड्यांना आधार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

कशास आई, भिजविसि डोळे उजळ तुझें भाल
रात्रीच्या गर्भांत उद्यांचा असे उषःकाल
सरणावरती आज आमुचीं पेटतांच प्रेतें
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते
लोहदण्ड तव पायांमधले खळाखळा तुटणार
आई, खळाखळा तुटणार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

आतां कर ओंकारा, तांडव गिळावया घास
नाचत गर्जत टाक बळींच्या गळ्यावरी फांस
रक्तमांस लुटण्यास गिधाडें येउं देत क्रूर
पहा मोकळें केलें आतां त्यासाठीं ऊर
शरिरांचा कर सुखेनैव या सुखेनैव संहार
मरणा, सुखेनैव संहार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

—कुसुमाग्रज

४३५८
का.वा.

# नवा शिपाई

## परिचय

आधुनिक मराठी कवितेचे कुलगुरु असा केशवसुतांचा यथार्थ लौकिक आहे. आत्माविष्कारांतली उत्कट स्वाभाविकता, कल्पकतेमधली नावीन्यपूर्ण विविधता, जीवनविषयक दृष्टिकोनांत पदोपदीं प्रतीत होणारी प्रगतिप्रियता, इत्यादि अनेक गुणांनीं त्यांची कविता नटलेली आहे. त्यांचा आवेश बघायचा असेल, तर ' धार धरलिया प्यार जिवावर । रडोत रडतिल रांडापोरें । गतशतकांचीं पापें घोरें । क्षालायाला तुमचीं रुधिरें । पाहिजेत रे स्त्रैण न व्हा तर ।। ' हें तुतारींतलें कडवें वाचावें. त्यांची क्रांतिप्रियता पडताळून पाहायची असेल, तर ' गोफण ' ही कविता वाचावी. ' वैर तयांना जे गरिबी शिकवितात बाळांस ' हा त्यांतला चरण अविस्मरणीय आहे. कलेची निर्मिति कशी होते या अनुभूतीचें त्यांचें चित्रण किती कल्पनापूर्ण आहे हें झपूर्झा कवितेंतील खालील कडव्यांवरून दिसून येईल:-

ज्ञाताच्या कुंपणावरून
उड्डाण करून
चिद्घनचपला ही जाते
नाचत तेथें चकचकते
अंधुक आकृति
तिस दिसताती
त्या गाताती
निगूढ गीतीं
त्या गीतींचे ध्वनि निघती
झपूर्झा गडे झपूर्झा !

नवा शिपाई, ही त्यांची कविता अशीच वैशिष्ट्यपूर्ण आहे. मनुष्यामनुष्यामध्यें जातीच्या, धर्माच्या, वंशाच्या, राष्ट्राच्या आणि असल्याच शेंकडों कृत्रिम भेदांच्या

भिंती उभारल्या गेल्यामुळें या सुधारलेल्या विसाव्या शतकांतहि प्रलयकालाला सौम्य ठरविणारीं महायुद्धें होत आहेत, लढाईला लाजविणारे रक्तपात राजकारणाच्या निमित्तानें घडून येत आहेत, हरतऱ्हेच्या विषमतेचें राक्षसी थैमान समाजांत सर्रास सुरू आहे. अशा रीतीनें कलंकित झालेलें मानवी जीवनाचें मांगल्य यापुढें कायमचें उध्वस्त होतें कीं काय अशी भीति मोठमोठ्या लोकांना आज वाटत आहे. या भीतीचें निर्मूलन एकच गोष्ट करूं शकेल—सर्वसामान्य मनुष्याच्या मनांतला सुप्त बंधुभाव जागृत करून मनुष्य मनुष्याचा मित्र आहे ही श्रद्धा आचरणांत आणण्याइतकीं त्याच्या बुद्धीचीं आणि भावनांचीं क्षितिजें विशाल करून! अखिल मानवतेला कवटाळणाऱ्या या नव्या क्षितिजांकडे जाण्यासाठींच महात्माजींसारखीं मोठीं माणसें आज धडपडत आहेत. परममंगल अशा मानवधर्माच्या मूल्यांवरच यापुढें जगाचें उज्ज्वल भवितव्य अवलंबून आहे. ‘ नवा शिपाई ’ हें या मानवधर्माचें एक सुंदर स्तोत्र आहे असें निःशंकपणें म्हणतां येईल.

● ● ●

नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें,
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें !
ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा,
तेच पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा !
खादाड असे माझी भूक,
चतकोरानें मला न सूख;
कूपांतील मी नच मंडूक;
मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे !
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें !

जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;
कोठेंही जा—पायांखालीं तृणावृता भू दिसते,
कोठेंही जा—डोईवरतें दिसतें नीलांबर तें;

सावलींत गोजिरीं मुलें,
उन्हांत दिसतीं गोड फुलें,
बघतां मन हर्षून डुले;
तीं माझीं, मी त्यांचा, एकच ओघ अम्हांतुनि वाहे !
नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें !

पूजितसें मी कवणाला ? तर मी पूजीं अपुल्याला,
आपल्यामधें विश्व पाहुनी पूजीं मी विश्वाला
'मी' हा शब्दच मजला नलगे; संपुष्टी हे लोक
आणुनि तो, निजशिरीं ओढिती अनर्थ भलते देख !
लहान–मोठें मज न कळे
साधु–अधम हें द्वयहि गळे,
दूर–जवळ हा भाव पळे;
सर्वच मोठें–साधु–जवळ त्या सकलीं मी भरुनी राहें
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें !

हलवा करितां तिळावर जसे कण चढती पाकाचे
अहंस्फूर्तिच्या केंद्राभवतें वेष्टन तेंवि जडाचें;
आंत समचि निर्गुण तिलक वरि सदृश सगुण तो पाक,
परि अन्यां बोंचाया धरितो कांटे कीं प्रत्येक ?
अशी स्थिती ही असे जनीं !
कलह कसा जाइल मिटुनी ?
चिंता वागे हीच मनी.
शान्तीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे ।

—केशवसुत

## साद

### परिचय

परंपरेच्या दृष्टीनें बोरकर तांब्यांच्या घराण्यांतले असले तरी गोमंतकांतल्या निवासामुळें बालकवींनींसुद्धां ज्याचें कौतुक केलें असतें, असें सुंदर निसर्गचित्रण ते जितक्या ऐटीनें करूं शकतात, तितक्याच आर्ततेनें अंतर्मुख होऊन ते जीवन-विषयक उदात्त गीतेंहि गातात. त्यांच्या या दुसऱ्या विशेषाचा उगम संतवाङ्मया-विषयीं त्यांना वाटणाऱ्या उत्कट प्रेमांत आहे. 'अमृत घट' या सरस कौटुंबिक कवितें। घराबाहेर सुख शोधायला निघालेल्या तरुणाला 'वडील वाचिति गाथा पोथी। काळ तिथें तूं कमिलास किती?' हा जो त्यांनीं मार्मिक प्रश्न विचारला आहे त्याचें मूळ त्यांच्या या प्रवृत्तींतच आहे.

कठोर आत्मपरीक्षण करून एका ध्येयवादी जीवानें देवापाशीं मागितलेलें मागणें 'साद' या कवितेंत ग्रथित झालें आहे. गांधीवादानें मराठी वाङ्मयाला विनोबाजी भाव्यांच्या निबंधासारखें विचारप्रेरक गद्य जसें दिलें, तसेंच तत्त्व-चिंतनाच्या बैठकीवर उभारलेलें भावनोत्कट काव्यहि दिलें आहे हें या कविते-वरून दिसून येईल.

● ● ●

एकच माझा साद, ऐक प्रभु, एकच माझा साद
पचूं न देई मला कधींही इवलासाहि प्रमाद !

स्वार्थें माझे मिटतां लोचन
घाल त्यांत अविलंबें अंजन
मोहिं गुंततां जरा कुठें मन मागें लाव प्रवाद !

परदुःखावर शिजलें जें सुख
विटाळलें जरि तेणें हें मुख
या हृदयांतुनि त्या दुःखाचे उठवीं शत पडसाद !

ठेंच अचानक लाव पदांला
खोक पडूं दे अभिमानाला
पाज[1] यशाची चढतां मजला चढला जरि उन्माद !

कलेंतुनी घसरतां विलासीं
अथवा स्वातंत्र्यांतुनि दास्यीं
आग लावुनी आत्मसुखाला धुमसत ठेव विषाद !

निष्ठा जरि मम दुबळी झाली
खचवीं भू झणिं चरणांखालीं
विकल करीं वरवंचित प्राणा कोंडुनि अंतर्नाद !

विश्वनाटचविकसनीं तुझ्या या
रंगत मजला हवें फुलाया
दयामया ! कविपति ! निजनियमा न करी मज अपवाद !

पापासरशीं देउनि शापा
सन्मार्गीं मज लावीं बापा !
जाणतसें मी तुझ्या घरीं प्रभू ! शासन हाहि प्रसाद !

—बा. भ. बोरकर

१ पाज = दगडी पायऱ्यांचा डोंगरचढणीचा जिना

## अभ्यास

### १ महाराष्ट्र-भूपाळी

( १ ) या भूपाळींत प्राचीन महाराष्ट्राच्या कर्तृत्वाचें कवीनें वर्णन केलें आहे. अर्वाचीन महाराष्ट्रांतील संत, वीर व कवी यांचें असेंच वर्णन करायचें झाल्यास तुम्ही कोणकोणत्या व्यक्तींचा व प्रसंगांचा उल्लेख कराल ? महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांत ज्यांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे अशा पांच स्त्रियांचीं नांवें सांगा.

( २ ) तुला ' ............ परमेशा ' ही ओळ आपल्याला गोड कां वाटते ? या कवितेंतील तुम्हांला अधिक आवडणाऱ्या तीन ओळी सांगा. त्यांपैकीं प्रत्येक तुम्हांला कां आवडते तें स्पष्ट करा.

( ३ ) गोविंदाग्रज व यशवंत यांच्या महाराष्ट्रवर्णनपर कविता मिळवून त्या वाचा. याच पुस्तकांत कोल्हटकरांचें महाराष्ट्र-गीत आहे, तेंहि पाहा. कोणती तुम्हांला अधिक सरस वाटते ? कां ?

● ● ●

### २ तेथें कर माझे जुळती

( १ ) या कवितेंतल्या पहिल्या पांच कडव्यांत कवीनें कोणाकोणाचा त्याग वर्णन केला आहे ? प्रत्येकाच्या त्यागाचें अपूर्वत्व कशांत आहे ?

( २ ) या कवितेच्या पहिल्या तीन कडव्यांत ' हरि'चा उल्लेख आला आहे. त्यावरून कविमनावर कोणता प्रकाश पडतो ? कसा ?

( ३ ) ' यज्ञीं ज्यांनीं देउनि निज शिर ' हें या कवितेंतलें सर्वांत सुंदर कडवें होय. या मताचा सविस्तर परामर्श घ्या.

● ● ●

### ३ तुरुंगाच्या दारांत

( १ ) ' रसपरिपोषक वृत्तें वापरण्यांत यशवंत कुशल आहेत. ' या विधानाचा प्रस्तुत कवितेच्या आधारें परामर्श घ्या.

( २ ) कल्पना व भावना यांचा सुंदर संगम या कवितेंत कसा हृदयंगम झाला आहे तें स्पष्ट करा. यशवंतांच्या कल्पकतेचे कोणकोणते विशेष या कवितेंत आढळतात ?

( ३ ) ' तेथें कर माझे जुळती ' व ' तुरुंगाच्या दारांत ' या दोन्ही कविता आपल्याला उदात्त वातावरणांत घेऊन जातात. मात्र प्रत्येकीची उदात्तता निराळ्या प्रकारची आहे. या दृष्टीनें दोन्ही कवितांची तुलना करा.

● ● ●

## ४ केवढें हें क्रौर्य !

( १ ) या कवितेंतले पहिले सहा श्लोक ' पृथ्वी ' वृत्तांत असून शेवटचा सातवा श्लोक ' वसंततिलका ' वृत्तांत आहे. शेवटच्या श्लोकाच्या वृत्तांत कवीनें असा बदल कां केला आहे ?

( २ ) ' क्षणोक्षणीं पडे ' या श्लोकांत शब्दांनीं जणुं कांहीं रेषा आणि रंग यांचें स्वरूप धारण केलें आहे असें एक टीकाकार म्हणतात. तुम्हांला तें कितपत पटतें ?

( ३ ) गुर्जरकवि कलापी यांच्या एका कवितेचा माधव ज्युलियनांनीं केलेला ' एकच घाव ' हा अनुवाद वाचा. ( मंगल वाचन पुस्तक सातवें. ) दोन्ही कवितांत ' जखमी झालेला पक्षी ' हाच मुख्य विषय आहे. पण कवींचे दृष्टिकोन अगदीं भिन्न आहेत. असें असूनहि दोन्ही कविता आपल्याला चटका लावतात. यावरून कवितेच्या निर्मितीविषयीं काय काय निष्कर्ष निघतात ?

● ● ●

## ५ भेटेन नऊ महिन्यांनीं

( १ ) ही कविता कोणत्या गुणांमुळें आपल्याला हृदयस्पर्शी वाटते ?

( २ ) या कवितेंतल्या अकराव्या कडव्याच्या आधारें एक छोटी गोष्ट तयार करून ती वीस ओळींत लिहा.

( ३ ) ' होईल पहा ...... यमदूत ' आणि ' मी राजपुत्र दिलदार भोंवतीं शिपाई चार ' या ओळींतल्या यमकाविषयीं तुम्हांला काय वाटतें ?

● ● ●

## ६ आई

( १ ) या कवितेंतलें सर्वांत सुंदर कडवें कोणतें ? आपल्या मताचें साधार मंडन करा.

( २ ) ' साध्यासुध्या आयुष्यांत भरलेल्या काव्याची जाणीव प्राचीन कवितेपेक्षां अर्वाचीन कवितेंतच अधिक दिसून येते. ' या विधानाचें ' आई ' या कवितेच्या आधारें विवेचन करा.

( ३ ) ' आई ' व ' तुरुंगाच्या दारांत ' या दोन्ही कविता यशवंतांच्याच आहेत. या कवितांवरून कवीचें व्यक्तित्व व त्याची प्रतिभा यांच्यावर कोणता प्रकाश पडतो ?

● ● ●

## ७ देशाचा संसार

( १ ) या कवितेचा सारांश दहा ओळींत लिहा.

( २ ) ही कविता अभंगाऐवजीं एखाद्या प्राचीन वृत्तांत किंवा अर्वाचीन जातींत लिहिली गेली असती तर तिची परिणामकारकता कमी झाली असती कीं वाढली असती ?

( ३ ) ' छळक ते अंतीं मनीं पस्तावती । सज्जनांची शांति देखोनियां ' असें कवि म्हणतो. तुम्हांला तें पटतें काय ?

● ● ●

## ८ वहिनीस पत्र

( १ ) ' हें पत्र काव्यसृष्टींत अनेक दृष्टींनीं अपूर्व आहे. ' या विधानाचा परामर्श घ्या.

( २ ) सावरकर अभिजात कवि आहेत हें या कवितेंतल्या कोणकोणत्या गोष्टींवरून स्पष्ट होतें ?

( ३ ) ' अमर होय ती वंशलता । निर्वंश जिचा देवाकरितां ' असें कवि म्हणतो. कोणत्या देवाकरतां आजच्या भारतांतल्या तरुणांनीं असा त्याग केला पाहिजे ?

● ● ●

## ९ अश्रु

( १ ) प्रसाद हा साने गुरुजींच्या वाङ्मयाचा एक प्रमुख विशेष आहे. या कवितेच्या आधारें हें स्पष्ट करा.

( २ ) या कवितेंत कवीनें कोणकोणत्या पौराणिक कथांचा उल्लेख केला आहे ? या उल्लेखांवरून कवीचें मन व जीवन यांवर कोणता प्रकाश पडतो ?

( ३ ) खांडेकरांचा अश्रु ( मंदाकिनी ) हा लघुनिबंध वाचा.

● ● ●

## १० सागरास

( १ ) सावरकरांची कल्पकता श्रेष्ठ प्रतीची आहे हें या कवितेच्या आधारें सिद्ध करा.

( २ ) या कवितेंतली कोणती कल्पना तुम्हांला अधिक आवडते ? ती कां ?

( ३ ) 'सावरकरां'च्या कवितेंत अनेक प्रभावी गुण असले तरी तिच्यांत प्रसाद कमी आहे' असें एक टीकाकार म्हणतात. 'सागरास' ही कविता वाचून तुम्हांला या मतांत सत्यांश आहे असें वाटतें काय ? सोदाहरण विवेचन करा.

● ● ●

## ११ माझें मृत्युपत्र

( १ ) 'सावरकरांची ही पंचवीस श्लोकांची कविता म्हणजे राष्ट्राकरितां हंसत-मुखानें बलिदान करणाऱ्या एका देशभक्ताचें तेजस्वी आत्मचरित्रच आहे.' हें विधान स्पष्ट करा.

( २ ) या कवितेंत कोणकोणत्या रसांचा परिपोष झाला आहे ? सोदाहरण सांगा.

( ३ ) खालील पंक्ती विशेष सरस कां वाटतात तें सांगा—

( अ ) आनंदमग्न कुल गोकुल काय साचे

( आ ) प्रेमें तुझ्या अधिकची सुरसाल व्हावा

( इ ) जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें

( ई ) हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलों कृतार्थ

( उ ) कीं विस्तवांत हंसल्या बहु राजपूती

● ● ●

## १२ एक प्रसंग

( १ ) तीन तपांपूर्वी या कवितेंतून जें सामाजिक दुःख सूचित केलें गेलें तें आतां कितपत कमी झालें आहे ?

( २ ) 'अन्नदाता' ही कृष्णचंद्राची मराठींत अनुवादित झालेली दीर्घ कथा वाचा.

( ३ ) कथा-काव्य या दृष्टीनें या कवितेचें मूल्यमापन करा.

● ● ●

## १३ माझ्या जन्मभूमीचें नांव

( १ ) कवीनें वापरलेलें वृत्त कसें अनुरूप आहे तें स्पष्ट करा.

( २ ) समुद्राच्या भरतीच्या लाटा जशा पुढें पुढें जात असतात त्याप्रमाणें चांगल्या कलाकृतीचें सौंदर्य चढत्या पायरीनें वाढत जातें. या कवितेंतल्या श्लोकांची त्या दृष्टीनें चर्चा करा.

( ३ ) 'तूझ्या महोदार सारस्वताच्या महासागराचा जरी मीन मीं' असें टिळक कां म्हणतात ?

● ● ●

## १४ घे कुठार

( १ ) या कवितेंतला वृक्ष आणि तो तोडण्याकरितां आलेला लांकूडतोड्या यांच्यामध्यें होणारा संवाद वीस ओळींत लिहा.

( २ ) टिळक कवींची 'वृक्षान्योक्ति' ही कविता वाचा आणि तिच्याशीं या कवितेची तुलना करा.

( ३ ) या कवितेंतल्या वृक्षाप्रमाणें नदी आपला उपयोग करणाऱ्या लोकांना उद्देशून बोलत आहे अशी कल्पना करा. ती काय म्हणेल ?

● ● ●

## १५ महाराष्ट्र-गीत

( १ ) पहिल्या दोन कवितांतील कल्पनांचें वैशिष्ट्य स्पष्ट करा.

( २ ) कल्पनेइतकाच भावनेचा विलास या गीतांत आढळत नाहीं. असें होण्याचें

कारण काय असावें ? कोल्हटकरांचें इतर लेखन तुम्हीं थोडेसें वाचलें असल्यास त्या दृष्टीनें विचार करा.

( ३ ) 'जरिपटका', 'भगवा झेंडा' व 'महाराष्ट्र धर्म' यांच्यापैकीं प्रत्येका-वर एक एक परिच्छेद लिहा.

● ● ●

## १६ सुंदर मी होणार

( १ ) मरणाच्या दारांत कवीनें लिहिलेल्या या कवितेंत विलक्षण आशावाद आहे. तो निर्माण होण्याचीं कारणें सांगा.

( २ ) या कवितेंतलें शब्दसौंदर्य व कल्पनासौंदर्य स्पष्ट करा.

( ३ ) 'भारतीय संस्कृतींत वाढलेला कविच अशी कविता लिहूं शकेल' असें एका टीकाकारानें म्हटलें आहे. तुम्हांला तें कितपत पटतें ?

● ● ●

## १७ कृतज्ञता

( १ ) 'एक प्रसंग' व 'कृतज्ञता' यांची तुलना करा. कोणती कविता तुम्हांला अधिक आवडते ? कां ?

( २ ) 'या कवितेंत केवळ मृत्यूनेंच निर्माण केलेलें कारुण्य नाहीं. सामाजिक परिस्थितीनें निर्माण झालेलें दुःखहि तिच्यांत आहे.' असें म्हटलें तर तें योग्य होईल काय ?

( ३ ) 'दिंडी ही जाति कारुण्याचा परिपोष उत्कृष्ट रीतीनें करते,' या मताचें स्पष्टीकरण करा.

● ● ●

## १८ तानाजीच्या पत्नीचा विलाप

( १ ) ही कविता ओजस्वी असली तरी तिच्यांत एक प्रकारची कृत्रिमता आहे. ती कुठें कुठें जाणवते तें सांगा.

( २ ) कल्पना कवितेचें सौंदर्य वाढविते. पण केवळ कल्पकतेनें व्हावा तसा रसपरिपोष होत नाहीं. या विशिष्ट दृष्टीनें या कवितेचें रसग्रहण करा.

( ३ ) या कवितेंतलें कोणतें कडवें तुम्हांला अधिक आवडतें ? कां ?

● ● ●

## १९ आमुची मायबोली

( १ ) मातृभाषेचें माहात्म्य वर्णन करतांना कवीनें कोणत्या गोष्टींवर विशेष जोर दिला आहे, तें दहा ओळींत लिहा.

( २ ) पांचवा श्लोक कवीनें केवळ आपलेपणाच्या अभिमानानें लिहिला आहे कीं त्यांत वस्तुस्थितीचें दर्शन आहे ?

( ३ ) या कवितेंतल्या कोणत्या ओळी तुम्हांला अधिक परिणामकारक वाटतात ? कां ?

● ● ●

## २० सहगमन

( १ ) हें गीत कोण म्हणत आहे ? तें म्हणणारी व्यक्ति कोणत्या मनःस्थितींत आहे ?

( २ ) खालील कल्पना स्पष्ट करा—

( अ ) धडधडत्या ज्वालांच्या तालीं स्वर्ग गातसे !

( आ ) ज्वाला नच या विजय पताका

( इ ) शोधिते अंधतमिं मम किरणा

( ३ ) याच लेखकाच्या ‘ क्रौंचवध ’ कादंबरीच्या प्रस्तावनेंतला बुद्धि व भावना यांच्या परस्परसंबंधाविषयींचा परिच्छेद वाचा.

● ● ●

## २१ प्रेम आणि मरण

( १ ) या कवितेंत चित्रें काढावयाचीं आहेत अशी कल्पना करा. तुम्ही किती चित्रें काढाल आणि प्रत्येक चित्रांत काय काय दाखवाल तें सांगा.

( २ ) या कवितेंतल्या कोणत्या कल्पना तुम्हांला अधिक सरस वाटतात ? कां ?

( ३ ) विरोधदर्शनानें ही कविता कवीनें कशी परिणामकारक केली आहे तें सविस्तर सांगा.

● ● ●

## २२ रुद्रास आवाहन

( १ ) ‘ अर्थ, शब्द आणि नाद यांच्या सुसंवादानें काव्याची गोडी वाढते ’ हें या कवितेच्या आधारें स्पष्ट करा.

( २ ) ' मुकुट रंकास दे, करटि भूपाप्रती ' असें कवि कां म्हणतो ?

( ३ ) आज समाजांत कोणत्या प्रकारची शांति आहे ? कवीला कोणत्या प्रकारची शांति हवी आहे ?

● ● ●

## २३ द्या आम्हांला सुळीं

( १ ) कल्पना व भावना यांच्या संगमांतून सरस कविता निर्माण होते हें विधान या कवितेला कितपत लागूं पडतें ?

( २ ) ' आजवरी जुळविले—भरतवाक्य गीतिका ' या ओळींनीं या कवितेचें सौंदर्य वाढलें नसून उलट कमी झालें आहे, असें एक टीकाकार म्हणतात. त्यांच्या मताचा परामर्श घ्या.

( ३ ) कल्पकतेच्या दृष्टीनें ' रुद्रास आवाहन ' व ' द्या आम्हांला सुळीं ' यांची तुलना करा.

● ● ●

## २४ फत्तर आणि फुलें

( १ ) या कवितेंतल्या मध्यवर्ती कल्पनेचा उपयोग करून एक रूपक कथा लिहा.

( २ ) या कवितेच्या शेवटच्या दोन ओळींनीं तिच्या सौंदर्यांत कशी भर पडली आहे तें सांगा.

( ३ ) ' फत्तर आणि फुलें ' मधील कोणत्या ओळींवरून कवीनें पुन्हां सफाईचा हात फिरवायला हवा होता ?

● ● ●

## २५ क्रांतीचा जयजयकार

( १ ) कवि एका वृत्तपत्राच्या कचेरींत उप-संपादकाचें काम करीत असतांना ऐन मध्यरात्रीं एक वार्ता आली. अन्नसत्याग्रह करणारा एक क्रांतिकारक मृत्यु पावला होता. या वार्तेनें कवीच्या मनांत जी खळबळ उडाली तिच्यांतून ही कविता निर्माण झाली. या कवितेचा हा इतिहास लक्षांत घेऊन काव्यनिर्मिति कशी होते याविषयीं दहा ओळी लिहा.

( २ ) या कवितेंत कोणकोणत्या रसांचा आविष्कार झाला आहे? त्या रसांना परिपोषक अशी रचना करण्यांत प्रगट झालेलें कविप्रतिभेचें कौशल्य स्पष्ट करा.

( ३ ) या कवितेंतलें कोणतें कडवें तुम्हांला अधिक हृदयस्पर्शी वाटतें ? कां ?

● ● ●

## २६ नवा शिपाई

( १ ) या कवितेंत व्यक्त झालेला कवीचा ध्येयवाद थोडक्यांत सांगा.

( २ ) 'जिकडें जावें तिकडें माझीं भावंडें आहेत' असें कवि कां म्हणतो ?

( ३ ) या कवितेंतलीं गद्यप्राय रचनेचीं स्थळें शोधून काढा. 'कांहीं ठिकाणीं अशा रचनेमुळें विरस होत असला तरी कांहीं ठिकाणीं तीं कवितेचें सामर्थ्य वाढविण्याला कारणीभूत झालीं आहेत' हें विधान तुम्हांला कितपत पटतें ? सोदाहरण चर्चा करा.

● ● ●

## २७ साद

( १ ) कवि परमेश्वरापाशीं कोणकोणत्या गोष्टी मागत आहे ? तुमच्या दृष्टीनें त्या सर्वांत अधिक महत्त्वाची गोष्ट कोणती ?

( २ ) आपलीं अनेक सुखें परदुःखावरच शिजत असतात. पण त्या सुखाचा आस्वाद घेतांना आपल्याला मात्र याची जाणीव असत नाहीं. हें म्हणणें कितपत बरोबर आहे ?

( ३ ) 'जाणतसे मी तुझ्या घरीं प्रभु शासन हाहि प्रसाद' या ओळींतील कल्पनेचा पंधरा ओळींत विस्तार करा.

● ● ●

## २८ सामान्य प्रश्न

( १ ) 'मधुर सुगंधाप्रमाणें दीर्घकाळ वाचकांच्या स्मृतींत तरंगत राहणें हा सुंदर ललित कृतीचा एक प्रमुख गुण आहे' असें माधवराव पटवर्धन ( कवि माधव ज्युलियन् ) म्हणत असत. या पुस्तकांतल्या अशा कविता कोणत्या ?

( २ ) कविता वाचून संपविल्यावर मनांत रेंगाळत राहणाऱ्या या पुस्तकांतल्या पांच कल्पना आणि पांच ओळी सांगा.

( ३ ) या पुस्तकांतल्या कवितांतून भव्य कल्पनेचीं व रम्य कल्पनेचीं तीन तीन सुंदर उदाहरणें शोधून काढा.

( ४ ) यशवंत, सावरकर व साने गुरुजी यांनीं आपल्या कवितांत पौराणिक कथांचा सुंदर रीतीनें कसा उपयोग करून घेतला आहे, तें स्पष्ट करा.

( ५ ) या पुस्तकांतल्या कवितांचें रसदृष्ट्या वर्गीकरण करा. तुम्हांला कोणता रस अधिक आवडतो ? तो आवडण्याचीं कारणें काय ?

( ६ ) कविकल्पनांत चमत्कृतिजनक, संकेतात्मक व रसपरिपोषक असे तीन वर्ग केले तर त्यांतील श्रेष्ठ वर्ग कोणता ? या तिन्ही प्रकारच्या या पुस्तकांतल्या दोन दोन कल्पना सांगा.

( ७ ) ओज, प्रसाद व माधुर्य या दृष्टींनीं या पुस्तकांतल्या कवितांचें वर्गीकरण करा. तुमच्या दृष्टीनें त्या त्या वर्गांतल्या पहिल्या दोन कविता कोणत्या ?

( ८ ) ‘ फत्तर आणि फुलें ’ किंवा ‘ केवढें हें क्रौर्य ’ या कवितेचें वीस ओळींत रसग्रहण करा.

( ९ ) या सर्व-कवितांतल्या दहा सुभाषितवजा ओळी शोधून काढा.

● ● ●

२९९६७
बा.वा.
२१२२
३-२-६१

## कविपरिचय

**१ द. अ. तुळजापूरकर**—( दत्तो अप्पाजी तुळजापूरकर ) मुख्यतः गद्यलेखक. ‘ माझें रामायण ’ या प्रसिद्ध कादंबरीचे कर्ते. ‘ वत्सलावहिनींचीं पत्रें ’ हें त्यांचें खुसखुशीत पुस्तकहि एकेकाळीं लोकप्रिय होतें.

**२ बा. भ. बोरकर**—( बाळकृष्ण भगवंत बोरकर : जन्म १९१० ) १९३५ च्या आसपास उदयाला आलेले एक प्रतिभावान गोमंतकीय कवि. कल्पनेची कोमलता, भावनांची उदात्तता आणि रचनेतील नादमधुरता हे काव्याचे प्रमुख विशेष. ‘ जीवनसंगीत ’, ‘ दूध सागर ’ व ‘ आनंद भैरवी ’ या संग्रहांत त्यांची स्फुट कविता संकलित झाली आहे. लघुनिबंध व कादंबरी या क्षेत्रांतहि त्यांनीं संचार केला आहे.

**३ यशवंत**—( यशवंत दिनकर पेंढरकर : जन्म १८९९ ) १९०० ते १९४० या कालखंडांतले एक अग्रगण्य व अत्यंत लोकप्रिय कवि. तांबे व माधव ज्यूलियन याच्या जोडीनें त्यांनीं या कालांतील मराठी कविता संपन्न केली. भावनेची उत्कटता व शैलीची ओजस्विता हे कवितेचे विशेष. ‘ यशोधन ’, ‘ यशोगंध ’, ‘ यशोनिधि ’, ‘ ओजस्विनी ’ इत्यादि स्फुट काव्यांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. यांचें ‘ बंदिशाळा ’ हें सामाजिक खंडकाव्यहि वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**४ ना. वा. टिळक**—( नारायण वामन टिळक : १८६१–१९१९ ) अर्वाचीन मराठी कवितेचे एक पहिले प्रमुख संवर्धक, सात्त्विक भावना व प्रसन्न रचना हे काव्याचे विशेष. ‘ टिळकांची कविता ’, ‘ अभंगांजलि ’, ‘ वनवासी फूल ’ या पुस्तकांत महत्त्वाची रचना समाविष्ट झाली आहे. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळक यांनीं लिहिलेल्या सुंदर ‘ स्मृतिचित्रांत ’ टिळकांचें कविजीवन सविस्तर चित्रित झालें आहे.

**५ कुंजविहारी**—( हरिहर गुरुनाथ कुलकर्णी, सलगरकर : जन्म १८९६ ) राष्ट्रीय वृत्तीचे कवि. ‘ मुळशीचा पाळणा ’, ‘ तानाजी मालुसरे ’ वगैरे कवितांनीं

त्यांना लोकप्रिय केलें. ‘ गीतगुंजारव ’ या संग्रहांत सर्व कविता समाविष्ट झाली आहे.

**६ सेनापति बापट**—( पां. वा. बापट ) अखंड व उत्कट देशभक्ति आणि मुळशी सत्याग्रहासारख्या चळवळींचें नेतृत्व यांमुळें बापटांना सेनापति हें उपपद शोभून दिसतें. सेवावृत्ति आणि भावनाप्रधानता हे त्यांच्या जीवनाचे विशेषच लिखाणांत उतरले आहेत. आपल्या राष्ट्रभक्तीच्या आणि समाजसेवेच्या विचाराचा प्रचार करण्याकरितां त्यांनीं थोडें गद्यपद्य लिखाण केलें आहे.

**७ वि. दा. सावरकर**—( विनायक दामोदर सावरकर : जन्म १८८३ ) अव्वल दर्जाचे देशभक्त, समाजसुधारक, कवि आणि गद्य ग्रंथकार. ओज व कल्पकता हे काव्याचे प्रमुख गुण. त्यांच्याइतकी कल्पनेची भव्यता आधुनिक कवितेंत क्वचित्‌च आढळेल. ‘ सावरकरांची कविता ’ या काव्यसंग्रहांत त्यांची महत्त्वाची स्फुट कविता समाविष्ट झाली आहे.

**८ साने गुरुजी**—( पांडुरंग सदाशिव साने : १८९९–१९५० ) थोर शिक्षक, त्यागी देशभक्त, विद्यार्थिवर्गांत अभूतपूर्व लोकप्रियता मिळालेले १९३०–१९५० या काळांतील एक प्रमुख गद्य ग्रंथकार. त्यांचें वाङ्मय विपुल व विविध आहे. सद्‌भावनांची जागृति व सत्प्रवृत्तीची प्रेरणा हा त्यांच्या सर्व वाङ्मयाचा स्थायी भाव आहे. शैलीची कोमलता आणि प्रसन्नता व अंतरंगाची उदात्तता हे त्यांच्या लेखनाचे विशेष होत. काव्यसंग्रहाचें नांव ‘ पत्री.’

**९ ग. त्र्यं. माडखोलकर**—( गजानन त्र्यंबक माडखोलकर : जन्म १९०० ) १९२० नंतर उदयाला आलेले एक प्रमुख गद्य ग्रंथकार, शैलीकार लेखक व रसाळ चिकित्सक म्हणून त्यांचा मोठा लौकिक आहे. कादंबरीकार व वृत्तपत्राचे संपादक या दोन्ही क्षेत्रांत त्यांचें नांव गाजलें आहे. पूर्व वयांत त्यांनीं थोडें कविता-लेखन केलें आहे.

**१० वा. गो. मायदेव**—( वासुदेव गोविंद मायदेव : जन्म १८९४ ) प्रसाद व प्रेमळपणा हे कवितेचे विशेष. यांनीं विपुल शिशु गीतें लिहिलीं आहेत. ‘ भावतरंग ’, ‘ भावनिर्झर ’ वगैरे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

**११ श्री. कृ. कोल्हटकर**—( श्रीपाद कृष्ण कोल्हटकर : १८७१–१९३४ ) मराठींतल्या विनोदाचे जनक म्हणून सुप्रसिद्ध. शिवाय नाटककार व टीकाकार या दोन्ही नात्यांनीं यांनीं मराठी वाङ्मयाची बहुमोल सेवा केली आहे. पूर्ववयांत यांनीं थोडी कविता लिहिली होती. ती 'गीतोपायन' या पुस्तकांत समाविष्ट केली आहे.

**१२ गोविंद**—( गोविंद त्र्यंबक दरेकर : १८७४–१९२६ ) नाशिकचे प्रसिद्ध अर्वाचीन शाहीर. शरीरानें पंगु पण मनानें तेजस्वी. टिळकयुगांत महाराष्ट्रांत देशभक्तीची जोपासना ज्यांनीं साहित्याच्या द्वारें केली त्यांत गोविंदाची गणना होते. काव्यसंग्रह : स्वातंत्र्य शाहीर कवि गोविंद यांची कविता.

**१३ गिरीश**—( शंकर केशव कानेटकर : जन्म १८९३ ) १९२०–४० या कालखंडांतले एक लोकप्रिय कवि. प्रसन्न व विविध रचना. अभागी कमल, आंबराई, कांचनगंगा, फलभार वगैरे पुस्तकें प्रसिद्ध.

**१४ माधव ज्यूलियन**—( माधव त्र्यंबक पटवर्धन : १८९४–१९३९ ) १९२०–४० या कालखंडांतले एक श्रेष्ठ प्रतिभावान कवि. नवीन वृत्तांचे व रचनेचे पुरस्कर्ते. भावनांची उत्कटता, कल्पनेची तरलता व रचनेची विविधता यांबद्दल प्रसिद्ध. विरहतरंग, स्वप्नरंजन, सुधारक, गज्जलांजलि वगैरे प्रसिद्ध पुस्तकें.

**१५ वि. स. खांडेकर**—( विष्णु सखाराम खांडेकर : जन्म १८९८ ) १९२० नंतरच्या कालखंडांतले एक लेखक. कथा, टीका, कादंबरी, लघुनिबंध, चित्रपट वगैरे क्षेत्रांत लेखन केलें आहे. यांनीं पूर्ववयांत थोडी कविताहि लिहिली आहे.

**१६ गोविंदाग्रज**—( राम गणेश गडकरी : १८८४–१९१९ ) कवि, विनोदी लेखक व नाटककार म्हणून महाराष्ट्राला अत्यंत प्रिय असलेले लेखक. कल्पनेची स्वैरता व चमत्कृतिजनकता आणि भावनेची गाढता व विविधता हे प्रतिभेचे विशेष. डौलदार अलंकारप्रचुर शैली. गद्य व पद्य या दोन्ही क्षेत्रांत अव्वल दर्जाचें लेखन. काव्यसंग्रह : वाग्वैजयंती.

**१७ भा. रा. तांबे**—( भास्कर रामचंद्र तांबे : १८७४–१९४१ ) केशवसुतांप्रमाणें तांबे यांनींहि आधुनिक मराठी कवितेच्या विकासाला मोठा हातभार

लावला आहे. त्यांच्या कवितेंत कल्पना, भावना व नादमाधुर्य यांचा हृदयंगम संगम आढळतो. काव्यसंग्रह : तांबे यांची कविता.

**१८ केशवकुमार**—( प्रल्हाद केशव अत्रे : जन्म १८९८ ) १९२० नंतरच्या कालखंडांतले एक अष्टपैलु व अग्रगण्य लेखक. विनोदकार, नाटककार, चित्रपटकथाकार व पत्रकार म्हणून विशेष प्रसिद्ध. सर्व कविता ‘ गीतगंगा ’ या संग्रहांत समाविष्ट.

**१९ कुसुमाग्रज**—( विष्णु वामन शिरवाडकर : जन्म १९१२ ) १९३५ नंतरच्या कालखंडांतले एक श्रेष्ठ कवि कल्पकता, भावनोत्कटता, ओजस्विता हे काव्याचे विशेष. काव्यसंग्रह : विशाखा, किनारा.

**२० केशवसुत**—( कृष्णाजी केशव दामले : १८६६–१९०५ ) आधुनिक मराठी कवितेचे प्रमुख प्रवर्तक. ओज व जिव्हाळा हे काव्याचे विशेष. काव्यसंग्रह : केशवसुतांची कविता.

• • •

वाचनालय
BVBK-0404359